सहल थंड प्रदेशाची
थर्मल • स्वेटर्स • जर्किन
ग्लोज • सॉक्स • कॅप्स्
बरंच काही एकाच ठिकाणी
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
• कापड बाजार, नं. 9422226599
• यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
• सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, पुणे. मो. 7775089505

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९–५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. २९.०५.२०२५ | अंक नं. ५० | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

Elite banquet
A.C. बॅन्क्वेट हॉल
अहिल्यानगर मध्ये पहिल्यांदा ए.सी. बॅन्क्वेट हॉल,
भव्य हॉल व प्रशस्त पार्किंग
* वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस
* शुभकार्य, साखरपुडा
* डोहाळे जेवण, मुंज
* नामकरण समारंभ
* कॉर्पोरेट इव्हेंट्स
व इ. कार्यक्रमासाठी उपलब्ध
हॉटेल संकेत
टिळक रोड, स्वतिक चौक, स्टेशन रोड, अहिल्यानगर
9422222020

22 कॅरेट सोन्याचा सर्वात कमी दर
दागिन्यांच्या मजुरीवर 20%* पर्यंत सूट
ठुशी, कुंदन ज्वेलरीच्या मजुरीवर 50%* पर्यंत सूट
आपला जुना दागिना एक्सचेंज करा आणि मिळवा 100%* किंमतीचा परतावा.
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

स्मार्ट असो वा मार्ट..मिळ असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉइंट | पॉइंट्सवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

उच्च दर्जा.. योग्य किंमत..
हिच तर आमची खासियत..
Available In Top Brands
Hettich | HÄFELE | GRASS | blum | ITALICA | ebco
NEW BOMBAY Since 1972
KITCHENS & WARDROBE
Ahilyanagar Off.: Excel Arcade, Near HDF Bank, Laltaki, Ahilynagar
Pune Off.: 1, Patil Plaza, Mitra Mandal Chowk, Pune.
Cell.: 98909 85601 I 98222 94670.

मुलांच्या उज्वल भविष्यासाठी... प्रख्यात, प्रदिर्घ अनुभवी सर्व विषयांचे नामांकित क्लासेस् एकाच छताखाली!
सन २०२५ मध्ये १२वी बोर्ड आणि जेईई परिक्षेत सर्व विषयांत अभूतपुर्व यश! सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!
Regular | CET | JEE | NEET च्या परिपूर्ण तयारीसाठ
प्रवेश प्रक्रिया सुरु
११ वी PCMB विषयांसाठी बॅचेस
दि.५ जुन २०२५ पासून सुरु.
PCMB विषयांचे तज्ञ मार्गदर्शक
प्रा. विवेक चौधरी PHYSICS | प्रा. प्रमोद ढगे CHEMISTRY | प्रा. प्रभाकर गवांदे MATHS | प्रा. सुरेश जावळे BIOLOGY
चौधरी PHYSICS क्लासेस
न्यू आर्टस कॉलेज गेट समोर, लेंडकर मळा, बालिकाश्रम रोड, अहिल्यानगर.
MOB. 9955 35 2323 | 820 837 4446

# लायसन्स काढण्यासाठी आलेल्या चालकाचे वाहन आरटीओ कार्यालयाच्या संरक्षक भिंतीला धडकले

## भरधाव वेगामुळे दोन्ही एअर बॅग्ज उघडल्या; कारचे मोठे नुकसान, चालक बालंबाल बचावला

नगर – वाहन चालविण्याचा परवाना काढण्यासाठी मारुती कंपनीची अल्टो के १० ही कार घेवून आरटीओ कार्यालयाच्या आवारात आलेल्या व्यक्तीचे कारवरील नियंत्रण सुटल्याने सदर कार कार्यालयाच्या आवारात भरधाव वेगात घुसून संरक्षक भिंतीला जावून धडकली. या भीषण अपघातात कारचालक सुदैवाने बचावला असून कारचे मात्र मोठे नुकसान झाले आहे. २९ मे रोजी सकाळी ९.३० च्या सुमारास ही घटना घडली आहे.




धडकलेली कार व उघडलेल्या एअर बॅग्ज.

वाहन चालविण्याचा परवाना काढण्यासाठी एक व्यक्ती कार घेवून सकाळीच आरटीओ कार्यालयाच्या आवारात आला. गेटमधून कार आत गेल्यावर चालकाचे कारवरील नियंत्रण सुटले आणि कार सुसाट वेगात पुढे जावू लागली. त्याच वेळी तेथून डॉ. बाबासाहेब आंबेडकर कामगार सेनेचे जिल्हाध्यक्ष मनोज साळवे हे पायी जात होते. त्यांनी प्रसंगावधान राखत बाजूला उडी मारल्याने ते बालंबाल बचावले. ही कार तशीच भरधाव वेगात पुढे जावून आरटीओ कार्यालयाच्या संरक्षक भिंतीला जावून धडकली.

ही धडक एवढी जोराची होती की, कारच्या दोन्ही एअर बॅग उघडून फुटल्या, तसेच पुढील बाजूचे दोन्ही टायरही फुटले आहेत. कारचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, या भीषण अपघातातून कार चालक सुदैवाने बचावला आहे. अपघातानंतर तेथे असलेले मनोज साळवे व इतरांनी कारचालकाला बाहेर काढले. तसेच त्यास उपचारासाठी रुग्णालयात पाठविले. सकाळची वेळ असल्याने आरटीओ कार्यालयाच्या आवारात गर्दी कमी होती, तसेच कार संरक्षक भिंतीला धडकली म्हणून मोठा अनर्थ टळला आहे.

महेंद्र पेडावाला
रजवाडी गुजराती थाळी
दर रविवारी दालबाटी व चुरमा व दररोज आमरसचा बेत
हापुस आमरस 400/- किलो
ट्रेन पार्सल, किटी पार्टी व बर्थडे पार्टी सुविधा उपलब्ध.
कापड बाजार, अहिल्यानगर. | पार्सल सुविधा उपलब्ध...

सुट्ट्या लागल्या
भाच्यांना, बहिणीला कपडे घ्यायचेत...?
चला तर मग मयुरी मॉलला
बाबा सुट फ्रॉक पार्टीवेअर ड्रेस व बरेच काही
१५-१६ वर्षापर्यंतच्या मुला-मुलींसाठी
सर्वांसाठी सर्व प्रकारचे कपडे
असंख्य नवनवीन व्हरायटीज्
होलसेल पेक्षाही कमी दरात
अहमदनगर जिल्ह्यातील प्रथम भव्य लेडीज मॉल
मयुरी लेडीज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कूलजवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर.
9028201188

महाराष्ट्रातील सर्वात स्वस्त कापड मॉल महावीर मॉल
स्वस्त म्हणजे नक्की काय असतं..?
रेनकोट आणि छत्री महोत्सव
पावसाळा सुरु होण्या पूर्वी पावसाळ्याची तयारी करुया
झील आणि वर्षा रेनकोटवर सरसकट 20% डिस्काउंट
१० जून पर्यंत रेनकोट खरेदी करा आणि अधिकचा डिस्काउंट मिळवा..
सर्व फ्रेश स्टॉक, नवीन डिझाईन रेडी स्टॉकमध्ये उपलब्ध
* सर्व शालेय मुलांचे सॅक वाले रेनकोट मिळतील.
* लेडीज रेनकोट मिळतील.
अधिक माहितीसाठी भेट द्या.. श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँके जवळ, मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

कॅन्सर ला घाबरु नका, तज्ञ डॉक्टरांचा योग्य सल्ला घ्या!
MEDICAL & SURGICAL ONCOLOGY
आता पूर्ण वेळ अहिल्यानगर मध्ये
INDO IRISH HOSPITAL
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना
आयुष्मान भारत योजना
मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी
STAR Health | Oriental Insurance | RELIANCE General Insurance | BAJAJ Allianz | SBI general | TATA AIG | HDFC ERGO | care HEALTH INSURANCE
व इतर सर्व कॅशलेस इंशुरन्स उपलब्ध...
Tapowan Road, A. Nagar | For Appointment 913042 3336 | 9860310001

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
30 ते 70% डिस्काउंट सेल
खरेदी | खरेदीवर पॉइंट | पॉइंट्सवर गिफ्ट
आला रे आला राजपाल सेल आला..!
संगमनेर (02425) 222226 | अहिल्यानगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132 | श्रीरामपूर (02422) 220090

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक




नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# नगर शहर व तालुक्यामध्ये जमीन खरेदी करणाऱ्यांची सामाजिक, आर्थिक आणि गुन्हेगारी पार्श्वभूमी तपासावी

## ताबामारी करणाऱ्या टोळ्यांना राजकिय वरदहस्त असल्याने ते कायद्याला अजिबात जुमानत नाहीत : मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

नगर - नगर शहर आणि तालुक्यामध्ये जमीन खरेदी करणाऱ्या परजिल्ह्यातील लोकांची सामाजिक, आर्थिक आणि गुन्हेगारी पार्श्वभूमी तपासावी, अशी मागणी माजी पंचायत समिती सदस्य तथा भारतीय जनसंसदचे जिल्हा अध्यक्ष सुधीर भद्रे यांनी केली आहे.

आपल्या देशामध्ये कोणाही व्यक्तीला कुठेही जमीन खरेदी करण्याचा अधिकार आहे. मात्र सध्या नगर शहरातील उपनगरांमध्ये व तालुक्यातील गावांमध्ये जमिनीच्या किमती गगनाला भिडलेल्या असल्यामुळे अतिरिक्त आर्थिक लोभापायी काही लोक वादातील जमीन खरेदी करतात. सदर जमीन ताब्यात घेण्यासाठी शहर आणि जिल्ह्यातील काही विशेष टोळ्या कार्यरत आहेत. या टोळीला ताबेमारी करण्यासाठी ठराविक रकमेची सुपारी दिली जाते. वादातील जमीन घेणारे संबंधित पोलीस ठाण्याच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सुद्धा आर्थिक आमिषाला बळी पाडतात. जेणेकरून मुळ जमीनधारकाला व सहकब्जेधारकांना पोलीस मदत मिळू शकणार नाही. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन पोलिसांची प्रतिमा सुद्धा डागाळते. विशेष म्हणजे न्यायालयामध्ये दावे सुरू असलेल्या प्रकरणांमध्ये सुद्धा ताबामारीचे गैरप्रकार घडत आहेत.

नगर शहरासह जिल्ह्यामधे अशा ताबामारी करणाऱ्या अनेक टोळ्या कार्यरत आहेत. या टोळ्यांचा व्यवसाय बेकायदेशीर ताबे मारण्याचा असल्याने ते कायद्याला अजिबात जुमानत नाहीत. दुर्दैवाने त्यांना राजकीय वरदहस्तही लाभतो. मात्र पोलिस खात्याने मनावर घेतले तर अशा टोळ्यांचा बिमोड व्हायला वेळ लागत नाही.

चिचोंडी पाटील ता. जि. अहिल्यानगर येथे सुमारे दीड वर्षांपूर्वी झालेल्या ताबामारीच्या गुंडटोळीचा एक म्होरक्या सध्या नाशिक जेलमध्ये मोका अंतर्गत एक वर्ष कारावासासाठी तोफखाना पोलीस स्टेशनने पाठवला आहे. तरीसुद्धा अशा अनेक टोळ्या जिल्हयात कार्यरत असून इतर पोलीस स्टेशन नेमके कोणत्या विशिष्ट कारणामुळे अशा गुंडांची दादागिरी सहन करतात याची तपासणी नवीन आलेले जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी करावी अशी मागणी भारतीय जनसंसदने केली आहे.

इतर जिल्ह्यातील सातारा, सांगली, पुणे, संभाजीनगर येथील काही लोक नगर शहर आणि तालुक्यातील काही गावांमध्ये वादातील जमिनी खरेदी करताना दिसत आहेत.

वादातील जमिनी खरेदी करणाऱ्या आणि ताबामारी करणाऱ्या परजिल्ह्यातील लोकांची त्या जमिनीच्या खरेदी खतावरील रक्कम देण्याची आर्थिक पात्रता आहे का? त्याचप्रमाणे यापूर्वी त्या लोकांनी त्यांच्या जिल्ह्यांमध्ये अशाच वादातील जमीन खरेदी करून कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण केला आहे काय? हे लोक हिस्ट्रीशिटर आहेत का? किंवा व्हाईट कॉलर गुंड आहेत याची सखोल तपासणी करावी, अशी मागणी भारतीय जनसंसदचे राज्य अध्यक्ष अशोक सब्बन, नगर तालुका अध्यक्ष पोपटराव साठे, शहर अध्यक्ष रईस शेख, माजी संरपंच कैलास पठारे, वीरबहादुर प्रजापती, सुनील टाक, बबलू खोसला, बाळासाहेब पालवे, अशोक डाके, विजय शिरसाठ व जिल्हाध्यक्ष सुधीर भद्रे यांनी लेखी निवेदनाद्वारे नवीन आलेले जिल्हा पोलिस अधिक्षक व जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदनाद्वारे करून निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, गृहमंत्री, पोलिस महासंचालक, मुंबई, विशेष पोलिस महानिरीक्षक, नाशिक यांना पाठविल्या आहेत.

# अतिवृष्टी व महापुरामुळे महावितरणचे मोठे नुकसान

## ८ रोहित्रे, ५३ उच्चदाब तर १११ लघुदाब वाहिनीचे पोल पडले, तारा तुटल्या





अतिवृष्टी व महापुरामुळे नगर तालुक्यात उन्मळून पडलेले महावितरणचे रोहित्रे व पोल.

नगर - नगर तालुक्याच्या दक्षिण भागात २७ मे रोजी झालेल्या अतिवृष्टी व महापुरात महावितरणचे ८ रोहित्रे, ५३ उच्चदाब तर १११ लघुदाब वाहिनीचे विद्युत पोल वाकून, उन्मळून पडले आहेत. १०० हून अधिक विद्युत तारा तुटल्या तर अनेक इन्सुलेटर खराब झालेत. त्याचबरोबर इतरही नुकसान झाले. त्यामुळे या आपत्तीत लाखो रुपयांचा आर्थिक फटका महावितरणला बसल्याची माहिती नगर तालुक्याचे उपकार्यकारी अभियंता उमाकांत सपकाळे यांनी दिली.

नगर तालुक्यातील २७ मे रोजी दुपारी केडगाव, सावेडी, चास, वाळकी या ४ मंडलांत अतिवृष्टीची नोंद झाली आहे. सर्वाधिक पाऊस चास मंडलात कोसळला. या पावसाने तालुक्याच्या दक्षिण भागात असलेल्या पूर्वा व वालुंबा या नद्यांना इतिहासात प्रथमच एवढा मोठा महापूर आला, नदीच्या पाण्याने धोक्याची पातळी ओलांडत पाणी शेतात घुसले आहे. गावागावातील तलाव बंधारे फुटून शेतात पाणी घुसल्याने शेतातील माती, झाडेही वाहून गेले.

या अतिवृष्टी व महापुरामुळे वाळकी परिसरात ३ रोहित्रे, १२ उच्चदाब तर ४० लघुदाब वाहिनीचे पोल पडले, खडकी परिसरात ३ रोहित्रे, १५ उच्चदाब तर ४१ लघुदाब वाहिनीचे पोल पडले, सारोळा कासार परिसरात ८ उच्चदाब तर ६ लघुदाब वाहिनीचे पोल पडले, भोरवाडी परिसरात ४ उच्चदाब तर ७ लघुदाब वाहिनीचे पोल पडले, अकोळनेर परिसरात २ रोहित्रे, ८ उच्चदाब तर ९ लघुदाब वाहिनीचे पोल पडले, शेंडी परिसरात २ लघुदाब वाहिनीचे पोल पडले, निंबोडी परिसरात ६ उच्चदाब तर ६ लघुदाब वाहिनीचे पोल पडले. या सर्व ठिकाणी तारा तुटल्या आहेत. यामुळे महावितरणचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

### २४ तासांच्या आत वीज पुरवठा केला सुरळीत

अतिवृष्टीने झाडे, शेतीसह महावितरणच्या वीज वाहिन्या, विजेचे पोलचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अशा परिस्थितीतही महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी रात्री-अपरात्री चिखलातून, पुराच्या पाण्यातून, रानावनातून, सुविधांचा अभाव असताना नैसर्गिक संकटाशी सामना करत जीवाची बाजी लावत २४ तासांच्या आत सर्व गावांमधील सिंगल फेज तसेच शेती वाहिन्यांचा विद्युत पुरवठा सुरू केला आहे. नुकसान झालेल्या सर्व ठिकाणी महावितरणचे अधिक्षक अभियंता रमेश पवार, कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण, उपकार्यकारी अभियंता उमाकांत सपकाळे यांनी प्रत्यक्ष भेटी देत पाहणी केली. तसेच पुरवठा दारांशी संपर्क साधून नुकसान झालेल्या ठिकाणी नवीन रोहित्रे, पोल, तारा टाकण्याचे काम सुरु करण्यात आले असल्याचेही उपकार्यकारी अभियंता सपकाळे यांनी सांगितले.

### सारोळा कासार कक्षाची तालुक्यात अव्वल कामगिरी

सारोळा कासार कक्षाअंतर्गत सारोळा कासार, अकोळनेर, भोरवाडी, जाधववाडी, घोसपुरी या गावांना वीज पुरवठा करण्यात येतो. २७ मे रोजी मुसळधार पाऊस सुरु होताच या कक्षाचे शाखा अभियंता संदीप बराट यांनी प्रसंगावधान राखत उपकेंद्रातून सर्व गावांचा वीज पुरवठा खंडित केला. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. तसेच महावितरणचे अधिक्षक अभियंता रमेश पवार, कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण, उपकार्यकारी अभियंता उमाकांत सपकाळे यांच्याशी संपर्क साधून त्यांच्या मार्गदर्शनाखाली २८ मे रोजी सकाळी ७ वाजता कक्षातील वीज कर्मचारी राहुल थोरवे, अन्सार शेख, दत्तात्रय सातपुते, लक्ष्मण काळे, दीक्षा उमरानकर यांच्या समवेत दुरुस्तीचे काम सुरु केले. पोल पडलेला भाग वगळून इतर मार्गाने या सर्व गावांचा वीज पुरवठा अवघ्या ३ तासानंतर टप्प्याटप्प्याने सुरु केला. तसेच दुपारनंतर शेती वाहिन्यांचा वीज पुरवठाही सुरळीत करत नागरिकांची होणारी गैरसोय दूर केली. अभियंता संदीप बराट व त्यांच्या सहकाऱ्यांची ही तत्पर कामगिरी तालुक्यात अव्वल ठरली आहे. त्यामुळे सोशल मिडीयाच्या माध्यमातून सर्व गावांमधील ग्रामस्थांनी त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करत त्यांचे आभार व्यक्त केले. वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी अक्षरशः अडथळ्यांची शर्यत पार करत अधिकाऱ्यांनी, कर्मचाऱ्यांना रात्रंदिवस तारेवरची कसरत करावी लागत आहे. म्हणूनच 'जनतेला प्रकाशमय करणारे प्रकाशदूत' जनमाणसात आदराचे स्थान ठरले.





शेतकरी व नागरिकांशी संवाद साधून नुकसानीची पाहणी करताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील. समवेत आमदार शिवाजी कर्डीले, आमदार काशिनाथ दाते, बबनराव पाचपुते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, तहसीलदार संजय शिंदे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सागर चौधरी, पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सुनील तुंभारे आदी. (छाया - लहू दळवी)

# अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे युद्धपातळीवर करा

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे निर्देश; अतिवृष्टी नुकसानीची पालकमंत्र्यांकडून पाहणी, आपत्तीच्या काळात शासन जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभे

नगर - अतिवृष्टीमुळे अहिल्यानगर तालुक्यातील तीन मंडळाच्या ४५ गावांमध्ये शेतपीक, फळपीक, बंधारे, रस्ते, घरे, पुलांचे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी पशुधनाचीही हानी झाली आहे. आपत्तीच्या काळात शासन जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून नुकसानीच्या मदतीपासून एकही नागरिक वंचित राहणार नाही, अशी ग्वाही जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. झालेल्या नुकसानीचे पंचनामे युद्धपातळीवर करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

अहिल्यानगर तालुक्यातील अकोळनेर, खडकी व वाळकी या गावात झालेल्या नुकसानीची मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करत उपस्थित शेतकरी व नागरिकांशी संवाद साधत झालेल्या नुकसानीची माहिती घेतली. यावेळी आमदार शिवाजी कर्डीले, आमदार काशिनाथ दाते, माजी आमदार बबनराव पाचपुते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, तहसीलदार संजय शिंदे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सागर चौधरी, पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सुनील तुंभारे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी अकोळनेर गावातील वालुंबा नदी परिसरात झालेल्या नुकसानीची पाहणी करत झालेल्या नुकसानीची ग्रामस्थांकडून माहिती घेतली.

खडकी गावामध्ये ऋषिकेश निकम यांच्या शेतामधील मोसंबीसह इतर पिकाची, शंकूतला तात्याराम कोठुळे यांच्या नुकसान झालेल्या शेतीची पाहणी करून त्यांच्याशी संवाद साधत झालेल्या नुकसानीची माहिती जाणून घेतली. तसेच पुराच्या पाण्यात अडकून पडलेल्या सयाजी कोठुळे यांच्या कुटुंबातील सदस्यांसमवेत संवाद साधून कुटुंबीयांना धीर देत घाबरू नका, शासन तुमच्या पाठीशी उभे असल्याची ग्वाहीही मंत्री विखे पाटील यांनी दिली.

वाळकी येथे गावठाणातील पूल परिसरातील तसेच जुंदरे मळा परीसरातील नुकसानीची पाहणी करून ग्रामस्थांकडून झालेल्या नुकसानीची माहितीही त्यांनी घेतली.

### वाळकी येथे अधिकाऱ्यांकडून घेतला आढावा

नुकसानीच्या पाहणीनंतर मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी वाळकी येथे अधिकाऱ्यांकडून आढावा घेतांना म्हणाले, मागील ५० ते ६० वर्षानंतर एकाच दिवसात १०० मिलिमीटरपेक्षा अधिक पाऊस झाल्याने नागरिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. अशा संकटाच्या काळात नागरिकांना आधार देण्याची गरज आहे. नुकसानग्रस्त गावातील पंचनामे तातडीने होण्यासाठी जिल्ह्याच्या इतर तालुक्यातील मनुष्यबळ याकामी उपयोगात आणावे. ज्या गावामध्ये पावसाच्या पाण्यामुळे रस्ते खराब झाले असतील त्या रस्त्यांची तसेच बंधाऱ्यांची तातडीने दुरुस्ती करावी. गावांतील विद्युत प्रवाह सुरळीत होणे अत्यंत आवश्यक आहे. ज्या ठिकाणी रोहित्र बदलण्याची आवश्यकता असेल त्याठिकाणी ती तातडीने बदलून विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी विद्युत विभागाने तातडीने उपाययोजना राबविण्याच्या सूचनाही विखे पाटील यांनी दिल्या.

पशुधनासाठीच्या चाऱ्याचेही नुकसान झाल्याने इतर तालुक्यात उत्पादित केलेल्या चाऱ्याची वाहतूक करत नागरिकांच्या मागणीनुसार चारा उपलब्ध करून देण्यात यावा. पावसाच्या पाण्यामुळे ज्या नागरिकांच्या घरांचे नुकसान झाले असेल अशा कुटुंबांच्या निवाऱ्याची तात्पुरती व्यवस्था जिल्हा परिषदांच्या शाळेमध्ये करण्यात यावी. त्याठिकाणी अन्न, पाणी, वीज पुरेश्या प्रमाणात औषधी उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

ज्या गावांतील ओढे, नदीचा प्रवाह अतिक्रमणामुळे बदलला असेल त्या ठिकाणची अतिक्रमणे तातडीने काढण्यात यावीत. भविष्यात अशी परिस्थिती उद्भवू नये यासाठी नागरिकांनी ही अतिक्रमणे काढण्यासाठी प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहनही विखे पाटील यांनी केले. यावेळी विविध विभागांच्या अधिकाऱ्यांसमवेत ग्रामस्थ उपस्थित होते.

# तलाठी कार्यालयातील खाजगी व्यक्तींकडून नागरिकांची होतेयं लूट

नगर - अनेक तलाठ्यांनी आपल्या हाताखाली शासकीय कामकाज करण्यासाठी खासगी व्यक्तींची परस्पर नियुक्ती केल्या असल्याची तक्रार राज्य लाचलुचपत विभागाच्यावतीने शासनाकडे करण्यात आली होती. महसूल विभागाला तक्रार प्राप्त झाल्यानंतर कक्ष अधिकाऱ्यांच्यावतीने अखेर अशा प्रकारचे वर्तन करणाऱ्या तलाठ्यांवर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

राज्याच्या अपर महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांनी सापळा पडताळणी कारवाई दरम्यान तलाठी हे त्यांचे शासकीय कामकाज एखाद्या खासगी कार्यालयातून करतात तसेच त्यांची शासकीय कामे करण्यासाठी अनधिकृतपणे खासगी व्यक्तींची नियुक्ती केली आहे. अशा व्यक्तीकडून शासकीय कामे करवून घेतली जातात. तसेच खासगी कार्यालयात शासकीय दस्तावेज ठेवतात. ही बाब कारवाईसाठी शासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे. त्यानुषंगाने कक्ष अधिकारी यांनी आदेश दिले आहे की, महाराष्ट्र जमीन महसूल संहितामधील तरतुदीनुसार ग्राम महसूल अधिकारी, तलाठी यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या नमूद केलेल्या आहेत. सदर कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडताना ग्राम महसूल अधिकारी यांनी शासनाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. तसेच, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ अन्वये प्रत्येक शासकीय कर्मचारी, अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य पालन करताना, वर्तणूकविषयक नियम विहित करण्यात आलेले आहेत. सदर नियमांचे पालन प्रत्येक शासकीय कर्मचारी अधिकारी यांनी करणे आवश्यक असुन शासकीय कामकाज करण्यासाठी खासगी व्यक्ती, मदतनीस नेमण्याबाबत शासनस्तरावरून कोणत्याही सूचना देण्यात आलेल्या नाहीत. तलाठी हे शासकीय कामकाज करण्यासाठी खासगी व्यक्ती नेमत असतील तर संबंधित तलाठी यांच्याविरूद्ध शासनाच्या सध्याच्या नियमांतर्गत तात्काळ उचित कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र या आदेशाला अहिल्यानगर जिल्ह्यात काही तलाठ्यांनी तिलांजली दिली आहे. अजूनही तलाठी कार्यालयात खाजगी इसम तलाठी कार्यालयात काम करत असल्याचं दिसून येत आहे. याबाबत नगर शहरातील देवकर भाऊसाहेब अहिलाजी यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन देऊन या तलाठी कार्यालया मध्ये खाजगी इसम काम पाहत असून या खाजगी इसमांकडून सर्वसामान्य नागरिकांकडून छोट्या मोठ्या कामांसाठी मोठ्या प्रमाणात पैसे वसूल करत असल्याची तक्रार केली आहे. जे नागरिक पैसे देत नाहित त्यांचे काम करण्यास विलंब केला जातो या बाबत तलाठी कार्यालयातील अधिकाऱ्यांना सांगूनही ते या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष करत आहेत. त्यामुळे अशा खासगी इसमांवर कारवाई व्हावी अशी मागणी देवकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन...



## जान है तो जहॉन है...

आजकाल अचानक दुःखद बातम्या येतात की, एखादा ४०-५० चा मनुष्य हृदयविकाराने गेला किंवा त्याला/तिला कॅन्सर वा अन्य गंभीर व्याधी झाली.

बदलते वातावरण, फास्टफूड, कलुषित प्रदूषित जीवनमान, वाढते स्ट्रेस-स्पर्धा या व इतर कारणांमुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत.

त्यात ४०/५० वयात तर अधिकच काळजी घेणे गरजेचे बनत आहे. अर्थातच प्रत्येक कुटुंब प्रमुखाने स्वतःचा व सर्व सदस्यांचा/फॅमिलीचा हेल्थ इन्शुरन्स न चुकता उतरवलाच पाहिजे. नसता आरोग्यासह मोठे आर्थिक संकटही पचवावे लागते.

सामान्यतः पन्नाशीनंतर - वाढत्या वयानुसार विविध आजार-विकारांची शक्यता बळावली जाते.

वाढत्या वयानुसार कमी ऐकण्या-पाहण्याची क्षमता कमी होणे, कमकुवत इम्युनिटी, शुगर, उच्च रक्तदाब, हृदयरोग, कर्करोग, ॲसिडीटी, अपचन या समस्या येऊ शकतात. त्यासाठी पन्नाशीनंतर वेळोवेळी काही आवश्यक चाचण्या व गरजेच्या तपासण्या करत राहिलात तर आजारांना प्रतिबंध करता येतो किंवा त्याची तीव्रता टाळता येते. यादृष्टीने हाडांची तपासणी, कोलेस्टेरॉल, बीपी, शुगर तपासणी, कोलोनोस्कोपी मॅमोग्राम (महिला), किडनी चाचणी, श्रवण व दृष्टी चाचणी करणे आवश्यक व फायदेशीर होईल.


याशिवाय आनंदी, समाधानी राहत शकतो कार्यमग्न राहणे, छंद व्यासंग करीत जगणे. जगाचा कानोसा घेत जास्तीत जास्त फिरणे यामुळे जीवन सहजसुंदर राहू शकते.

Atter all what you are is what yat feel. So fell Happy & Healthy कारण, जान है तो जहॉन है...

### अपघातात महिलेचा मृत्यू; ओळख पटविण्याचे आवाहन

नगर - नगर पुणे रोडवरील कायनेटिक चौक येथे २१ मे रोजी झालेल्या रस्ता अपघातात ७५ वर्षीय महिला गंभीर जखमी झाली होती. उपचारादरम्यान २३ मे रोजी तिचा मृत्यू झाला असून या महिलेची ओळख पटलेली नाही. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आलेली आहे. मृत महिलेचे वर्णन वय अंदाजे ७५ वर्षे, उंची ५ फुट, रंग गोरा, केस लांब व पांढरे (मेहंदी लावलेले सोनेरी रंगाचे) उजव्या हाताला अपघातात मार लागलेला, अंगात हॉस्पीटलचे कपडे असे आहे. महिलेबाबत किंवा तिच्या नातेवाईकांबाबत माहिती असल्यास कोतवाली पोलिस फोन नं. (०२४१)२४१६११७ वर अथवा पोलीस नाईक अनिता तारडे मो. ८३८००७७७८३ यांचेशी संपर्क करावा.


### सज्जन चोटीले यांचे अल्प आजाराने निधन



नगर - शाहू महाराज कॉलनी भिंगार येथील रहिवासी सज्जन चिरंजीव चोटीले (वय ८०) यांचे २८ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या भिंगार अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात १ मुलगा, २ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. पुष्पराज चोटीले यांचे ते वडील होत.

### महादेव महातेकर यांचे आकस्मिक निधन



नगर - लालगुलाब कॉलनी, भिस्तबाग येथील रहिवासी महादेव बाबुराव महातेकर (वय ८७) यांचे २८ मे रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात २ मुले, २ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सूर्यकांत व दीपक महातेकर यांचे ते वडील होत.

### छायाबाई कोकाटे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - चिचोंडी पाटील येथील रहिवासी छाया गणपत कोकाटे (वय ५५) यांचे २८ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पती, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### रतनबाई परकाळे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - कोळगाव लगड वस्ती, ता. श्रीगोंदा येथील रहिवासी रतनबाई गणपत परकाळे (वय ८५) यांचे २८ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर मौजे कोळगाव लगड वस्ती येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. बाबासाहेब व राजेश परकाळे यांच्या त्या धाकट्या मातोश्री होत.

### सुशिलाबाई जक्कन यांचे हृदयविकाराने निधन



नगर - शितळादेवी चौक, तोफखाना येथील रहिवासी सुशिलाबाई पेंटय्या जक्कन (वय ७८) यांचे २८ मे रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात २ मुले, ३ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. देवीदास व विनायक जक्कन यांच्या त्या मातोश्री होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### हाडे ठेवा मजबूत

मजबूत हाडे ठेवण्यासाठी पुरेसा कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी मिळणे आवश्यक आहे. आहारात कॅल्शियमचे स्रोत (दूध, दही, चीज, पालेभाजी) समाविष्ट करा आणि व्हिटॅमिन डी मिळवण्यासाठी नियमित सूर्यप्रकाश आणि व्हिटॅमिन डी युक्त पदार्थांचे सेवन करा. मजबूत हाडे ठेवण्यासाठी योग्य आहार, व्यायाम आणि जीवनशैली आवश्यक आहे. तसेच, नियमित डॉक्टरांचा सल्ला घेणे आणि आवश्यक असल्यास, औषधोपचार करणे आवश्यक आहे. व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे हाडे कमकुवत होऊ शकतात.या व्यतिरिक्त, तुम्ही मशरूम, सॉफल आणि दुधाचे पदार्थ यासारखे व्हिटॅमिन डी समृद्ध पदार्थांचे सेवन करू शकता. नियमित व्यायाम केल्याने हाडे मजबूत होऊ शकतात. वजन उचलणे, योगासने, चालणे यासारखे व्यायाम केल्याने हाडांचे पोषण आणि बळकटीकरण होते.

## पाककला

### मुगाची डाळ विथ मेथी

**साहित्य :** १ मेथीची जुडी, १ वाटी हिरवे मुगाची डाळ, २ चमचे मसाला, १ चमचा हळद, १ चमचा राई, १ चमचा जीरे, १ मोठा कांदा, १ मोठा टोमॅटो, १/२ चमचा हिंग, चवीप्रमाणे मीठ, १ पळी तेल, सहा-सात लसणाच्या पाकळ्या (ठेचलेल्या), १ चमचा साखर,

**कृती :** मुगाची डाळ पाच ते सहा तास भिजवून घ्यावी त्याचबरोबर मेथी स्वच्छ धुऊन निवडून घ्या. गॅसवर कुकर ठेवून त्यात तेल घालावे ते गरज झाल्यावर राई, जिरे, हिंग, लसणाच्या पाकळ्या फोडणीला घालावे. नंतर त्यात कांदा, टोमॅटो घालून चांगला परतून घ्यावा व थोडा शिजल्यावर मसाला हळद घालून सर्व एकजीव करावे व नंतर बारीक चिरलेली मेथी व भिजलेली हिरव्या मुगाची डाळ घालावी. सर्व एकत्र करून वरून त्यात चवीप्रमाणे मीठ व थोडी साखर घालून पाणी न घालता दोन शिट्या घ्याव्या व दोन मिनिटे बारीक करून गॅस बंद करावा.

## सौंदर्य

### प्रकृतीचा समतोल राखण्यासाठी

✻ जेंव्हा आपण शांत असतो तेंव्हा ताणतणावाचे बाह्याविष्कार म्हणजे चेहऱ्यावरील पिटिका व ठिपके कमी होतात. सुदर्शन क्रिया, जे एक उत्तम श्वसनाचे तंत्र आहे, साठलेले ताणतणाव शरीर व मनाबाहेर फेकते आणि आपल्याला शांत करते.

✻ मेथीची पाने वाटून केसांना लावल्यास व मेथ्या अर्धा-अर्धा चमचा सकाळ-सायंकाळ खाल्ल्यास केस गळणे बंद होते.

✻ चेहऱ्याचा तेलकटपणा जाण्यासाठी ज्येष्ठमध पूड पाण्यात कालवून रात्री लावावी.

## वास्तू

लक्ष्मीची पावले, शुभ-लाभ या व्यतिरिक्त स्वस्तिकचे निशाणही घराच्या दरवाजावर लावणे शुभ मानले जाते. असे केल्याने सौभाग्य आणि समृद्धी वेगाने वाढते.

## सल्ला

खूप वेळ आणि सतत बोलत राहिल्यानंतर तुम्हाला कसे वाटते? थकल्यासारखे ना? अशा बडबडीमुळे थिल्लरपणाचे ओझे मनावर टाकले जाते. मौनात उर्जेचा संचय होतो. ध्यानाबरोबर मौनाचा परिणाम किती प्रगाढ असतो याचा अनुभव घ्या.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. ३० मे २०२५

**विनायक चतुर्थी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, ज्येष्ठ शुक्लपक्ष, पुनर्वसु २१!२९, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ३९ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : आर्थिक विषयांमध्ये आपले प्रयत्न आपणास यश मिळण्याचे कारण ठरतील. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून समर्थन मिळेल.

**वृषभ** : कला क्षेत्रात यश मिळण्याची शक्यता आहे. आपणास नवे वाहन मिळण्याची शक्यता आहे. मानसन्मानात वाढ होईल. आरोग्य उत्तम राहील.

**मिथुन** : एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची भेट आपल्यासाठी आनंदाची ठरेल. धार्मिक कार्यांमध्ये खर्च होण्याची शक्यता आहे. श्रम अधिक झाल्यामुळे दमल्यासारखे वाटेल.

**कर्क** : आज आपणास कठोर श्रम करावे लागतील. काही निष्कारण चिंतांमुळे आपली व्यग्रता वाढेल. वाहने काळजीपूर्वक चालवा. मित्रांचा सहयोग मिळेल.

**सिंह** : आपला जोडीदार आपणास भावनात्मक पाठबळ देईल. मित्रांमध्ये होणारे वाद गैरसमज निर्माण करतील.

**कन्या** : मानसिक स्थिती आल्हाददायक राहील व वरिष्ठांबरोबर संपर्कात आल्याने प्रसन्न वातावरण राहील. संततीसौख्य लाभेल. आर्थिक बाबतीत काळ अनुकूल आहे.

**तूळ** : आजचा दिवस कालच्या दिवसापेक्षा चांगला नसेल. आरोग्याची काळजी घ्याल. व्यस्त राहाल. रहाते घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे.

**वृश्चिक** : आपल्या इच्छा सांगण्यासाठी ही उत्तम वेळ आहे. विशिष्ट कार्य पूर्ण होतील. महत्वपूर्ण व्यक्तींशी संपर्क लाभाचे राहतील. राजकारण्यांसाठी स्थिती संतोषजनक राहील.

**धनु** : कौटुंबिक विषयांमध्ये पैसा खर्च होईल. व्यापार-व्यवसायात स्थिती संमिश्र राहील. आर्थिक लाभ होईल. संतोषजनक स्थितीमुळे उत्साह वाढेल.


**मकर** : आपल्या जुन्या लोकांबरोबर किंवा आधार देणाऱ्या मित्रांना जोडणे या वेळी आपल्यासाठी फलदायी ठरेल. ेकरदार व्यक्तींसाठी वातावरण अनुकूल राहील.

**कुंभ** : एखाद्या जीवलगाबरोबर भागीदारीसाठी वैयक्तिक पातळीवर संबंध वाढविण्याचा प्रयत्न कराल. यशस्वी व्हाल.

**मीन** : चांगले भोजन मिळेल. मौजमजेत दिवस व्यतीत होईल. मुले त्रास देऊ शकतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## फिल्मीचक्कर क्र. ११९० सौ. शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :** १) ++++ और इन्सान (चित्रपटाचे नाव) ३) कल ++ और कल (चित्रपटाचे नाव) ५) +++ तेरी कसम (चित्रपटाचे नाव) ६) जुगनू, सीता और गीता, राजा जानी आदी चित्रपटांची नायिका ९) फिर वही दिल ++ हूं (चित्रपटाचे नाव) ११) एक दिवंगत संगीतकार १३) नवीन निश्चल, राखी यांचा एक चित्रपट १६) ऋषी कपूर, जयाप्रदा यांचा एक गाजलेला चित्रपट १७) मेरा ++ (चित्रपटाचे नाव) १९) राजा और ++ (चित्रपटाचे नाव) २०) स्मिता पाटील यांचा एक गाजलेला मराठी चित्रपट

**उभे शब्द :-** १) मिथुन चक्रवर्ती, जितेंद्र, रेखा, मंदाकिनी, विनोद मेहरा, मुनमुन सेन यांचा एक चित्रपट २) 'श्यामची आई' या मराठी चित्रपटाची नायिका ३) दिलीपकुमार, नादिरा, निम्मी यांचा एक चित्रपट ४) गंगा +++ (चित्रपटाचे नाव) ५) ++ देओल (अभिनेता) ७) राज बब्बर, दीपा साही, फारूक शेख आदींचा एक चित्रपट ८) धर्मेंद्र, हेमामालिनी, अमजदखान अरुणा इराणी यांचा एक चित्रपट १०) राज +++ (एक दिवंगत अभिनेता) १२) सनी देओल, जयाप्रदा, प्रसनजीत, शांतिप्रिया, अरुणा इराणी, प्रेम चोप्रा, शक्ती कपूर यात आहेत १४) ++ परांजपे (एक दिग्दर्शिका) १५) अमिताभ बच्चन, हेमामालिनी, अमजदखान, प्राण यांचा एक चित्रपट १८) मेरे ++ (चित्रपटाचे नाव)

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : जे ज्ञान समाजोपयोगी नाही त्याचा काहीही उपयोग नाही.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### पांढरी कावीळ म्हणजे काय?

रक्तातील बिलिरुबीनचं प्रमाण वाढलं, की डोळ्यांमध्ये पिवळेपणा येतो किंवा दिसतो, याला कावीळ असं म्हणतात. काही रुग्ण पांढरी कावीळ झाली आहे, असं सांगतात. याचा अर्थ रक्ताच्या तपासणीत बहुतांशी हिपेटायटिस 'बी' निदर्शनास आला आहे, असा होतो. रक्तातील बिलिरुबीनचं प्रमाण वाढलं, की डोळ्यांमध्ये पिवळेपणा येतो किंवा दिसतो, याला कावीळ असं म्हणतात. काही रुग्ण पांढरी कावीळ झाली आहे, असं सांगतात. याचा अर्थ रक्ताच्या तपासणीत बहुतांशी हिपेटायटिस 'बी' निदर्शनास आला आहे, असा होतो. भारतामध्ये ०.५ टक्के लोकांमध्ये हिपेटायटिस 'बी'चं इन्फेक्शन आढळून येते. अर्थात, यातील खूपच कमी लोकांच्या यकृतावर (लिव्हर) यामुळे परिणाम होतो. अशा रुग्णांबाबत हिपेटायटिस 'बी'च्या पुढील तपासण्या करुन त्यावर उपाय करण्याची गरज आहे किंवा नाही, हे ठरवलं जातं. व्हिटॅमिन 'बी' १२ची कमतरता, गिल्बर्ट सिंड्रोम आणि लाळ पेशीतील काही दोषांमध्ये यकृत ठणठणीत असतानादेखील डोळ्यांत पिवळेपणा दिसून येतो.

कावीळीचं निदान करण्यासाठी लिव्हर फन्क्शन टेस्ट ही प्राथमिक चाचणी केली जाते. यामध्ये काही चाचण्या असतात. वरील तीन कारणांमध्ये फक्त बिलिरुबीनचे प्रमाण वाढलेले असते. बाकी सर्व घटक नियमित असतात. याचे महत्त्व असे, की तीन कारणांपैकी व्हिटॅमिन १२ची कमतरता असल्यास, ते दिल्यास बरे होतात. गिल्बर्ट सिंड्रोम हा आजार नसून यामध्ये यकृतात बिलिरुबीनची विल्हेवाट लावण्याची प्रक्रिया मंदावलेली असते. हिमोलिटिक आजारांमध्ये यकृतात दोष नसून रक्तातील लाल पेशींत दोष असतो. यावरील उपाय रक्त तज्ज्ञांकडे असतो. असे बरेच रुग्ण गैरसमजामुळे पथ्य पाळतात आणि नको ती औषधे घेत असतात.

व्हायरस, मद्य, औषधे, वन्य औषधे आणि इतर असंख्य कारणांमुळे यकृताच्या पेशींना अपाय होतो. अशा बाधित पेशी मरण पावतात. या मृत पेशींमधील काही घटक (एएलटी आणि एएसटी) रक्तात जाऊन त्यांचे प्रमाण वाढते. असे झाल्यास बिलिरुबीन आणि एएलटी, एएसटी हे सर्वच वाढलेले असतात. वर लिहिल्याप्रमाणे रुग्णास व्हिटॅमिन बी १२ची कमतरता, लाल पेशींतील दोष किंवा गिल्बर्ट सिंड्रोममुळे कावीळ असेल, तर रक्तातील एएलटी आणि एएसटीचे प्रमाण पूर्णपणे सामान्य असते. फक्त बिलिरुबीन वाढलेले आढळते. हिपेटायटिस विषाणू, मद्य, काही औषधे, काही वनौषधी, ऑटो इम्युनिटी या आणि इतर बऱ्याच कारणांमुळे होतो. डेंग्यू, मलेरिया आणि क्वचित चिकनगुनिया या आजारांमध्येही हिपेटायटिस होतो. पाच प्रकारच्या विषाणूंमुळे हा हिपेटायटिस होतो. या व्हायरसना 'ए', 'बी', 'सी', 'डी', 'इ' अशी नावे आहेत. यांच्यामुळे यकृत सोडून इतर कुठल्याही अवयवावर परिणाम होत नाही, हे त्यांना हिपेटायटिस व्हायरस असे म्हणण्याचे कारण आहे. 'ए' आणि 'इ' हे आजार दूषित पाणी आणि अन्न पदार्थांतून पसरतात. 'ए' हा साधारणपणे १५ वर्षांखालील मुलांना होतो. १५-२० वर्षांवरील लोकांना 'इ' होतो. 'बी' आणि 'सी' हे दूषित रक्त किंवा ड्रग्ज घेणाऱ्यांमध्ये दिसतात. याशिवाय टॅटू करताना दूषित सुया वापरल्या गेल्यासही तो होऊ शकतो. हिपेटायटिस 'बी' हा लैंगिक क्रीयांमधूनही होऊ शकतो. मातेला तो असल्यास, नवजात शिशूलादेखील त्याची लागण होण्याची शक्यता असते. वैद्यकीय व्यावसायिक, डेंटिस्ट यांना रुग्णापासून हिपेटायटिस 'बी' होऊ शकतो.

यकृतामध्ये पित्त तयार होऊन एका नलिकेद्वारे आतड्यात सोडले जाते. या मार्गात अडथळा आल्यास एका प्रकारची कावीळ होते. या प्रकारच्या काविळीमुळे सुरुवातीपासून अंगाला खाज येणे, थंडीताप, पोटात दुखणे ही लक्षणे दिसून येतात. या प्रकारच्या काविळीत शस्त्रक्रिया किंवा एंडोस्कोपीद्वारे उपचार करावे लागतात.

### धैर्याचे महत्त्व

धैर्यधर नावाचे एक व्यापारी होते. व्यापार उत्तम चालत होता. आमदानी उत्तम होती. अर्थातच धैर्यधरांनी प्रामाणिकपणे ही संपत्ती कमावली होती. लोक त्यांना गमतीनं म्हणायचे, तुमचं नाव धैर्यधर आहे, पण तुम्ही आहात लक्ष्मीधर. होय, मी लक्ष्मीधर आहे; पण मूळचा मी धैर्यधरच खरा. धैर्यधर म्हणाले. बरीच वर्षे व्यापार केला. संसार सुखाचा झाला. आता जरा स्वास्थ्य आलं. धैर्यधरांनी विचार केला.

'आता जरा हिंडावं, फिरावं, देश बघावा. तीर्थयात्रा करावी, जीवनाचा आनंद लुटावा. मग आपले सेवक आणि आपला एक पुतण्या यांच्यावर कारभार सोपवून धैर्यधर तीर्थयात्रेला गेले. काशी-रामेश्वर, हिमालयात गेले. दोन महिने ते बाहेर होते. आता परत आलो की, पेढीवर बसायचं या उद्देशाने ते परतीच्या वाटेला लागले. पण परत येऊन बघतात तो काय? पुतण्या आणि सेवक घरात हताशपणे बसले होते.

'काय झालं ?' धैर्यधरांनी विचारलं. 'आपलं दुकान, पेढी सर्व आगीच्या भक्ष्यस्थानी पडलं. काही राहिलं नाही. आम्हीच कसेतरी वाचलो. आग कशी लागली समजलं नाही. पुतण्या म्हणाला. धैर्यधरांनाही क्षणभर अस्वस्थ वाटलं. पण ते म्हणाले, ठीक आहे. आता पुढे काय करायचं ते ठरवू बऱ्याच लोकांना वाटलं, 'आता काय होणार? सगळी राख झाली. आता धैर्यधर पुन्हा व्यवसाय सुरू करणार नाहीत.' दुसऱ्याच दिवशी त्या जळालेल्या दुकानावर लोकांना एक फलक दिसला. 'दुकान जळलं. पेढी जळली, सारं काही जळलं; पण धैर्य नाही जळलं! उद्यापासून दुकान पुन्हा सुरू करीत आहोत.' लोकांना पटलं की, धैर्यधर हे नुसतेच लक्ष्मीधर नसून खरेच धैर्यधर आहेत.

**तात्पर्य :** संकटाना धैर्याने तोंड दिलं तर मार्ग सापडतो.

## जीवन का अमृत (भाग १)



१२. यह बहुत अच्छा है कि आप सत्संग से आनंद प्राप्त करते हैं और प्यारे भाई-बहन आपकी वहाँ आने-जाने में सहायता करते हैं। सतगुरु की प्यारी साध संगत के बीच होना एक दुर्लभ वरदान होता है, जहाँ पर सतगुरु दया से, शिष्यों की उसके प्रति भक्ति विकसित होती है।

१३. अगर हम दूसरों को सुधारना चाहते हैं, तो पहले हमें अपने आप को सुधारना होगा, पर दुर्भाग्य से हम दूसरों को सुधारने के लिए बेचैन है। हम अपने अवगुणों को आत्म-निरीक्षण के द्वारा एक-एक करके निकालते जाएँ; इससे हर तरफ

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

शांति आ जाएगी। प्यार हर वस्तु को सुंदर बना देता है और अगर हम सभी से प्रेम करना सीख जाएँ, तो हमारे सारे अवगुण धोए जा सकते हैं। अगर शराबखाने में दो शराबी इकट्ठे बैठ सकते हैं तो प्रभु और सतगुरु के दो भक्त प्रेम से इकट्ठे क्यों नहीं बैठ सकते ?

अगर हमें इसमें कठिनाई होती है, तो इसलिए कि हमने अभी तक नाम की शराब नहीं पी है, दिव्य प्रेम को नहीं चखा है। धर्मग्रंथों को पढ़ने से और विभिन्न गुरुओं द्वारा बताई गई ज्ञान-ध्यान की बातों से हमें आधा छटाक भी प्रेम नहीं मिल सकता। जो खुराक हज्म होती है, वही ताकत (सूही म : १)

हज़रत मुहम्मद साहब भी अपने शिष्यों को मृत्यु से पहले मरने का अभ्यास करने के लिये कहते हुए फरमाते हैं:- मौउतू किवलअंत मौउतू अर्थात् अपनी मृत्यु होने से पहले मर। ख्वाजा हाफ़िज़, समश तबरेज़ और मौलाना रूम जैसे मुस्लिम दरवेशों ने भी ऐसे अद्वितीय अनुभव की महानता पर बड़ा बल दिया है:-

जब तक तू इन्द्रियों के घाट से ऊपर नहीं आता, आन्तरिक जीवन से अनभिज्ञ रहता है।

तेरे पास बाहरी शरीर रूपी वस्त्रों के अतिरिक्त भी वस्त्र हैं, फिर क्यों तू इस शरीर में से बाहर आने से डरता है ।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

यह विद्युत उर्जा चक्रों के माध्यम से मनुष्य को मिलती है। जिस से हम सोचते हैं बोलते हैं व कार्य करते हैं। ऐसे हरेक जानवर गाय, भैंस व पक्षी आदि में भी उनकी रीढ़ की हड्डी में उर्जा चक्र होते हैं। उन के सिर में धनात्मक विद्युत और पूँछ की जड़ में नकारात्मक विद्युत बनती है। उनमें भी जीवनी विद्युत मनुष्य की तरह रीढ़ की हड्डी में स्थित उर्जा चक्रों के बीच प्रवाहित होती रहती है। जिस से उनके जीवन के कार्य चलते रहते हैं। दुनिया के हरेक व्यक्ति या जीव में एक एक बैटरी रखी हुई है जिस में दो पोल, एक नेगेटिव और दूसरा पॉजिटिव है, जिन से विद्युत बनती है और हरेक व्यक्ति वा जीव अपना अपना कार्य करता है। ये बैटरी हरेक जीव में अलग अलग वोल्टेज की है। किसी में ६ बोल्ट, किसी में १२, २४, ३६, १०० आदि

### विशुद्ध ऊर्जा चक्र

की हैं। हरेक जीव की बैटरी छोटी व बड़ी उस की बनावट व सोच के अनुसार प्रकृति ने बना रखी है। ऐसे ही प्रत्येक पौधे में नेगेटिव विद्युत और पॉजिटिव विद्युत बनती है। यही सरकट सभी वनस्पतियों में है। इसी तरह प्राकृति के स्थूल पदार्थों के परमाणुओं में विद्युत की धारायें इलेक्ट्रोन, न्यूट्रान और प्रोटोन बह रही हैं। हम कह सकते हैं हरेक जीव व निर्जीव एक सर्किट है और एक सिस्टम से कार्य करता है। सभी जीव, निर्जीव व प्रकृति एक तत्व ईथर के द्वारा आपस में जुड़े हुये हैं। अतः हम कह सकते हैं कि इस आकाश के अन्दर जो कुछ हो रहा है वह एक नेटवर्क की तरह कार्य करता है।

आकाश - ईथर -५

हरेक जीव व पेड़ पौधों में एक सर्किट है जिस में नेगेटिव और पाजिटिव विद्युत के दो पोल हैं। ऐसे ही प्रत्येक ग्रह और उपग्रह में भी दो शक्ति केन्द्र उत्तरी ध्रुव और दक्षिणी ध्रुव हैं। दक्षिणी ध्रुव पर ४. प्रेम - ४.१ इस खेल में उन शब्दों को शामिल करें, जिनमें 'हार्ट' शब्द आ रहा हो; जैसे-हार्ड हार्टड, सॉफ्ट हार्टड, स्माल, मीन तथा हॉफ हार्टड आदि। छात्रों से कहें कि वे हर एक पेज पर एक अलग तरह के हार्ट यानी दिल की तस्वीर बनाएँ और यह भी लिखें कि वह दिल क्या कहना चाहता है। संभवतः वे अंत में लिख सकते हैं-

'जब मेरा हृदय प्रेम से परिपूर्ण होता है तो मैं।'

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**शिक्षक :** बंडू, उठ, मला सांग ५७ भागीले ८ किती?
**बंडू :** ७ **शिक्षक :** बाकी?
**बंडू :** बाकी काही नाही, निवांत

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ डोनाल्ड ट्रम्प यांनी एफबीआयच्या संचालकपदी या भारतीयाची निवड केली आहे? - काश पटेल

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

### बालकांचे आजार

श्वास/दमा :

मधुकोष टीका ज्या व्याधीमध्ये वायुला उर्ध्वगती प्राप्त होते, त्या व्याधीला श्वास म्हणजेच दमा असे म्हणतात.

लोहाराचा भाता जोराने फुकला असता ज्याप्रमाणे आवाज करीत वायू बाहेर पडतो, त्याप्रमाणे बालकात श्वासोच्छ्वास हा सशब्द व अवरोधपूर्ण असतो. का या व्याधीमध्ये श्वासावरोध हे लक्षण निर्माण झाल्याने बालकास बाह्य सृष्टीतील ऑक्सिजनचा परवठा योग्य तऱ्हेने होऊ शकत नाही. त्यामुळे बालक ऑक्सिजन मिळविण्याचा अधिक अधिक प्रयत्न करते व याचाच परिणाम म्हणून बालकाची श्वासोच्छ्वासाची गती वाढते. धूर, धूळ, अति थंड प्रदेशात राहणे, फ्रीजमधील पाणी व पेय पिणे, आईस्क्रीम, चॉकलेट्स, बिस्किटे, जिलेबी यांसारख्या पदार्थांचे अति प्रमाणात सेवन करणे.

श्वासाची गती वाढणे, श्वास घेताना व बाहेर टाकताना त्रास होणे हे प्रमुख लक्षण दिसन येते. बालक जेव्हा श्वास घेते व सोडते, तेव्हा विशिष्ट आवाज निर्माण होतो. श्वास हा सतत जास्त पटीत व निरंतर सुरू असतो. कधीकधी त्यासोबत खोकल्याची ढास लागते. घसा खवखवणे, सरदी असणे, बालक झोपले असता श्वास वेग वाढतो व उठून बसले असता कफ खाली आल्यामुळे अडथळा दूर होऊन श्वास वेग कमी होतो. त्यामुळे बालक अनेक वेळा गुडघ्याला धरून बसते.

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००





आर्किटेक्ट इंजिनिअर्स अँण्ड सर्व्हेअर्स असो. च्या सभासदांसाठी कार्यशाळेत माहिती देताना निलेश साळी. (छाया - लहू दळवी)

# बहुमजली इमारतीचा वाढता कल पाहता भविष्यात कार पार्किंगसाठी आताच काम करणे आवश्यक

## निलेश साळी यांचे प्रतिपादन, आर्किटेक्ट इंजिनिअर्स अँण्ड सर्व्हेअर्स असो. च्या सभासदांसाठी कार्यशाळा

नगर - आर्किटेक्ट इंजिनिअर्स अँड सर्व्हेअर्स असो. अहिल्यानगर आणि पोलाद स्टील जालना यांच्या संयुक्त विद्यमाने अॅडव्हान्स ट्रेनिंग ऑन मल्टीलेव्हल कार पार्किंग सिस्टिम या विषयावर पुण्यातील NNIT कार पार्किंग सिस्टीम प्रा. लि.चे निलेश साळी यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

अहिल्यानगरमध्ये आता बहु मजली इमारतीचे बांधकाम मोठ्या प्रमाणात वाढले असून तळमजले पार्किंगसाठी कमी पडत आहेत. बिल्डर यांना प्रत्येक फ्लॅटधारकाला कार पार्किंग देणे गरजेचे झाले आहे. ग्राहकाला नजरेपुढे ठेऊन यासाठी विवध पर्याय वापरणे आता गरजेचे झाले असून त्या अनुषंगाने पुण्यातील या क्षेत्रातील तज्ज्ञ निलेश साळी यांच्या व्याख्यानाचे संस्था सभासदांसाठी आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कस्टमाइज डिझाइन, जागेचा पार्किंगसाठी योग्य वापर, पैश्यांची बचत, सुरक्षितता, ट्रॅफिक, वेळेची बचत आणि वर लिफ्टमधील सुरक्षितता याचा विचार करून कार पार्किंगचे डिझाइन आणि काम केले जाते. NNIT कार पार्किंग सिस्टिममध्ये टू लेव्हल डीपेंडांट स्टॅक पार्किंग, थ्री लेव्हल इनडीपेंडांट पिट पार्किंग पझल सिस्टिम, टॉवर पार्किंग सिस्टिम, टू लेव्हल इनडीपेंडांट स्टॅक पार्किंग, थ्री लेव्हल डीपेंडांट स्टॅक पार्किंग, थ्री लेव्हल बॅक टू बॅक पझल पार्किंग सिस्टिम, हॉरीझोंटल सर्क्यूलेशन पझल पार्किंग सिस्टिम, कांटिलिव्हर डीपेंडांट स्टॅक पार्किंग अश्या विविध प्रकारच्या सिस्टिम निलेश साळी यांनी जागा आणि विकसक यांची गरज याप्रमाणे डिझाईन केल्या आहेत.

शहरामध्ये पार्किंगसाठी जागा नसल्यास रोड बाजूला गाडी पार्क करण्याचे प्रमाण वाढत असून विकसक यांनी योग्य प्रकारे डिझाइन करून सर्व फ्लॅटधारकास कार पार्किंग उपलब्ध करून दिल्यास भविष्यातील संभाव्य ट्रॅफिक जॅम आणि कंट्रोल यांचा त्रास वाचणार आहे. कार पार्किंग डिझाईन करताना स्ट्रक्चरल डिझायनर यांच्याशी समन्वय ठेवणे, आपली आताची आणि भविष्यातील गरज ओळखून आताच प्लॅनिंगची व्यवस्था करणे गरजेचे आहे. वर पार्किंग बसवताना चांगले दर्जेदार साहित्य वापर, इलेक्ट्रिक सप्लायची जोडणी आणि योग्य वेळी मेंटेनन्स आवश्यक असल्याचे साळी यांनी सांगितले.

यावेळी संस्था उपाध्यक्ष विनोद काकडे यांनी संस्था अश्या उपक्रमातून सभासदांचे चांगल्या सेवा ग्राहकांना देण्यास मार्गदर्शन करत असून या माध्यमांतून शहराचा योग्य आणि तांत्रिक पद्धतीने विकासास चालना मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

पोलाद स्टील कंपनीचे आदेश गुंगे यांनी संस्थेच्या शहरविकासास पूरक उपक्रमास आमचे सहकार्य असल्याचे सांगितले. या उपक्रमास भूषण पांडव, शिरीष कुलकर्णी, वैभव देशमुख, प्रजाध जैन, नंदकिशोर घोडके, प्रितेश कांकरिया, संजय चांडवले, अजिंक्य बालटे, संतोष खांडेकर, आशिष मुथियान, रवींद्र खर्डे, आलोक जाजू, अनिल धोकरिया, निलेश बिहानी, सागर ढगे, जयप्रकाश विधाते, सभासद उपस्थित होते. प्रदिप तांदळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. सचिव अभिजित देवी यांनी आभार मानले.

# 'देवाभाऊ जिल्हा केसरी कुस्ती स्पर्धा' आता ४ व ५ जूनला शेवगावात रंगणार



नगर - नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसामुळे स्थगित करण्यात आलेली देवाभाऊ जिल्हा केसरी कुस्ती स्पर्धा २०२५ आता ४ व ५ जून रोजी नियोजित वेळापत्रकानुसार पार पडणार आहे. भाजपचे प्रदेश सरचिटणीस तथा आयोजक अरुण मुंढे आणि जिल्हा तालीम संघाचे अध्यक्ष पै. वैभव लांडगे यांनी ही माहिती दिली आहे. या स्पर्धेचे आयोजन अहिल्यानगर जिल्हा तालीम संघ, शेवगाव तालुका तालीम संघ आणि वंदे मातरम क्रीडा व सांस्कृतिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने खंडोबानगर, शेवगाव येथील मैदानावर करण्यात आले आहे. गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे मैदानाची व मल्लांच्या वाहतुकीची अडचण निर्माण झाल्याने ही स्पर्धा पुढे ढकलण्यात आली होती. मात्र आता नवीन तारखांनुसार पुन्हा नियोजन करण्यात आले असून, सर्व मल्लांनी वेळेवर उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

याचे उद्घाटन ४ जून रोजी सायंकाळी ६ वाजता तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ शास्त्री महाराज, राम महाराज झिंजुर्के व प्रशांत (नाना) भालेराव यांच्या हस्ते होणार आहे. तर बक्षीस वितरण समारंभ ५ जून रोजी सायंकाळी ६ वाजता होणार असून, यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. याच वेळी जीम व कुस्ती संकुलाचे उद्घाटन सुद्धा होणार आहे.

या स्पर्धेचे खास आकर्षण म्हणजे थरारक निमंत्रित कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख विरुद्ध दिल्लीचा रुस्तुम हिंद अजय बनवाल यांच्यात २ लाख रुपयांच्या बक्षीसाची कुस्ती रंगणार आहे. महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज पाटील विरुद्ध महाराष्ट्र केसरी हर्षद सदगीर यांच्यात १.५ लाख रुपयांची कुस्ती होणार आहे. महिला कुस्तीतही स्पर्धा पाहायला मिळणार असून नॅशनल मेडलिस्ट उषा कुमारी विरुद्ध नॅशनल मेडलिस्ट सोनाली मंडलिक यांच्यात १ लाख रुपयांची निमंत्रित कुस्ती होणार आहे.

या स्पर्धेत लहान गटांपासून मोठ्या गटांपर्यंत एकूण ९ गटांतील मल्लांचा समावेश असणार आहे. सर्व विजयी मल्लांसाठी भरघोस बक्षिसांचे नियोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतील एक नंबरचा मल्ल स्व. छबू पैलवान लांडगे यांच्या स्मरणार्थ चांदीची गदा प्रदान करण्यात येणार आहे. शेवगाव तालुक्यातील आणि जिल्ह्यातील सर्व कुस्तीप्रेमींनी या कुस्ती स्पर्धेला उपस्थित राहण्याचे म्हटले आहे.



केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांचा वाढदिवसाच्या निमित्ताने अहिल्यानगर जिल्ह्यातील नागरीकांच्यावतीने वेध अहिल्यादेवीचा हे पुस्तक भेट दिले. या वेळी अभय आगरकर, प्रा. भानुदास बेरड, सचिन पारखी, जालिंदर वाकचौरे उपस्थित होते. यावेळी अहिल्यानगर ते मनमाड रस्ता लवकरात लवकर सर्व अडथळे दूर करून पुर्ण करु. तसेच इतके दिवस हा रस्ता होऊ शकला नाही याची देखील खंत त्यांनी व्यक्त केली. तसेच अहिल्यादेवी यांच्या त्रिशताब्दी जयंतीची तयारी कुठ पर्यंत आली आहे याची देखील त्यांनी व्यस्त असताना देखील विचारपूस केली.

## स्पर्धा परीक्षेतील गुणवंतांचा ३० मे रोजी केडगावात सत्कार

### स्नेहदीपच्या कक्षाचे होणार उद्घाटन

नगर - अहिल्यानगरच्या पंचक्रोशीतील स्पर्धा परीक्षेतील गुणवंतांचा केडगाव मधील स्नेहांकुर केंद्रात स्नेहालय संस्थेने सत्कार आयोजित केला आहे. ३० मे रोजी दुपारी ४.३० वाजता होणारा हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे. मध्य प्रदेशचे माजी मुख्य सचिव शरदचंद्र बेहर, नूतन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घारगे आदी यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

यावेळी स्नेहालय संस्थेच्या स्नेहदीप रुग्णसेवा प्रकल्पातील एका कक्षाचे उद्घाटन होणार आहे.



अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचा निवृत्त अधिकारी व कर्मचारी वृंद यांच्यातर्फे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्ष शेख जमालभाई, पांडुरंग खेडकर, गटकळ, दत्तु आव्हाड, श्री. इनामदार, बाबा माळवदे, श्री. लाड, सय्यद जमादार, श्री. केळकर, राजेंद्र सावंत, शेख फकीर आदि उपस्थित होते. सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांच्या अडीअडचणी असल्यास मी नक्कीच दूर करेल, असे आश्वासन नूतन पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिले.

# मनपा कर्मचाऱ्यांच्या कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिल्याने धरणे आंदोलन स्थगित

नगर - महापालिका कामगार युनियनने प्रशासक तथा आयुक्त यांना कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत १४ मे रोजी बेमुदत धरणे आंदोलनाची नोटीस दिली होती. प्रशासनाने २१ मे रोजी युनियनला लेखी पत्र पाठवुन धरणे आंदोलन करू नये अशी विनंती केली परंतु या पत्रामध्ये कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत कोणताही ठोस निर्णय प्रशासनाने दिलेला नसल्यामुळे युनियन २८ मे रोजीच्या बेमुदत धरणे आंदोलनावर ठाम होती. महापालिकेचे उपायुक्त विजयकुमार मुंडे यांनी २७ मे रोजी सायंकाळी ५:३० वाजता मनपा अधिकारी व युनियन पदाधिकारी यांची कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत बैठक आयोजित केली होती. यामध्ये कामगारांच्या प्रश्नांवर साधकबाधक चर्चा झालेनंतर युनियनच्या वतीने युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर व सरचिटणीस कॉ. आनंदराव वायकर यांनी २८ मे रोजीचे बेमुदत धरणे आंदोलन स्थगित केल्याचे सांगितले.



मनपा अधिकारी व युनियन पदाधिकारी यांची कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत आयोजित बैठक. (छाया-लहू दळवी)

यानंतर बैठकीमध्ये पुढीलप्रमाणे कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांवर निर्णय घेण्यात आले. १) सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ५०६ कोर्ट कर्मचारी यांना पाचव्या वेतन आयोगाचा फरक देणेबाबत पुर्वी ठरल्याप्रमाणे फरकाच्या रक्कमांचे समान २४ हप्ते करून ते दरमहा वेतनासोबत अदा करण्याचे ठरले होते, त्याप्रमाणे दिवाळीपूर्वी एक हप्ता वेतनासोबत अदा करण्यात आला. त्यानंतर अद्यापपर्यंत फरकाचे हप्ते अदा करण्यात आलेले नव्हते. याविषयावर चर्चा करून उर्वरीत फरकाचे हप्ते दरमहा वेतनासोबत अदा करण्याचे लेखाधिकारी यांना उपायुक्त यांनी सुचना केली. एखाद्या महिन्यात अडचण आल्यास युनियनसोबत चर्चा करून निर्णय घेण्याचे सदर संयुक्त बैठकीत ठरले आहे. २) हद्दवाढीतील कामगारांचे सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे कामगारांना ५ व्या वेतनाच्या आयोगाच्या फरकाची रक्कम अदा करणेबाबतचा निर्णय झालेला असुन अद्यापपर्यंत त्यांचे फरकाचे तक्ते तयार केलेले नव्हते. याबाबत उपायुक्त यांनी सहाय्यक आयुक्त तथा आस्थापना प्रमुख यांना संबंधित कर्मचाऱ्यांचे फरकाचे तक्ते करण्याचे कामकाज सुरू करण्याचे आदेश दिले. तक्ते तयार झाल्यानंतर युनियनबरोबर चर्चा करून पुढील निर्णय घेण्याचे उभयपक्षी मान्य करण्यात आले आहे. ३) कामगारांचे ६ व्या वेतन आयोगाचे फरकाचे हप्त्यांपैकी २ हप्ते अद्यापपर्यंत कामगारांना अदा केलेले नव्हते त्यापैकी एक हप्ता कामगारांना सप्टेंबर २०२५ मध्ये तर उर्वरीत एक हप्ता दिवाळीनंतर अदा करण्याचे उभयपक्षी मान्य करण्यात आले. ४) सेवानिवृत्त कामगारांचे ६ व्या वेतन आयोगाचे उर्वरीत हप्ते त्वरित अदा करणेबाबत निर्णय घेण्यात आला. त्यापैकी ३ हप्ते या वेतनामध्ये अदा करण्यात आले आहेत व उर्वरीत हप्ते लवकरात लवकर अदा करण्याचे उभयपक्षी ठरले आहे. ५) कालबद्ध पदोन्नती योजनेच्या फरकाच्या रक्कमा गेल्या ८/१० वर्षांपासुन प्रलंबित होत्या. यापैकी कालबद्ध पदोन्नतीचे आदेशाप्रमाणे सेवाजेष्ठतेने कामगार-कर्मचाऱ्यांच्या फरकाच्या रक्कम अदा करण्याबाबत सुचना करण्यात आल्या व व त्या चालु महिन्यापासुन दरमहा अदा करण्याचे उभयपक्षी ठरविण्यात आले. ६) वैद्यकीय प्रतिपुर्तीची सर्व बिले तात्काळ कामगारांना अदा करण्यात यावीत. तसेच यापुढे कामगारांचे येणारी वैद्यकीय प्रतिपुर्तीची बिले दरमहा पगाराबरोबर अदा करण्यात यावीत. याबाबत उभयपक्षी चर्चा करून सेवाजेष्ठतेप्रमाणे दरमहा शक्य तेवढे जास्तीत जास्त बिले अदा करण्याचे ठरले. तसेच मार्च २०२६ पुर्वी वैद्यकीय प्रतिपुर्तीची सर्व बिले अदा करण्याबाबत उपायुक्त यांनी लेखाधिकारी यांना सुचना केल्या. ७) निवृत्ती वेतन अंशदान योजनेतील सुमारे २५० लाभार्थी यांचे प्रलंबित असलेल्या रक्कमा त्यांचे खाते उघडून त्यांच्या खात्यामध्ये वर्ग करण्यात याव्यात. याबाबत या योजनेतील सर्व लाभार्थ्यांच्या वेतनातुन कपात केलेल्या महानगरपालिकेचा हिस्सा या सर्व रक्कमा येत्या ६ महिन्यांचे आतमध्ये त्यांचे खात्यावर वर्ग करण्यात येतील. तसेच ज्या कामगार- कर्मचाऱ्यांचे अर्ज अद्याप भूरुन दिलेले नाहीत, त्यांना ताबडतोब अर्ज भरून आस्थापना विभागामार्फत सादर करणेबाबत युनियनने सहकार्य करण्याचे उभयपक्षी मान्य करण्यात आले. तसेच यापुढे नवीन नियुक्ती देत असतांना आस्थापना विभागाने याबाबतची सर्व पुर्तता करून घेऊनच नियुक्ती पत्र देणेबाबत सुचना करण्यात आल्या. ८) एल.जी.एस. एल.एस.जी.डी. परीक्षा उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना जादा वेतनवाढी मिळणेबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे अंतिम निर्णयासाठी तत्काळ पाठविण्याबाबतचा प्रस्ताव प्रशासक तथा आयुक्त रजेवर असलेमुळे ते रुजु झालेनंतर तात्काळ हा प्रस्ताव शासनाकडे अंतिम मंजुरीसाठी पाठविण्याचे उभयपक्षी मान्य करण्यात आले. ९) पात्र कामगार-कर्मचाऱ्यांना बढती व कालबद्ध पदोन्नती देणेकामी निवड समिती गठित करून या समितीमार्फत बढतीचे फायदे देण्याबाबत कार्यवाही चालु आहे. जुन २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात किंवा जुलै २०२५ च्या पहिल्या आठवडयामध्ये निवड समितीची बैठक घेऊन त्यावर निर्णय घेण्याचे ठरले. १०) महानगरपालिकेने महासभेमध्ये केलेल्या ठरावानुसार आरोग्य विभागातील आर.सी.एच. व एन.यु.एच.एम. मानधनावरील कर्मचाऱ्यांना कायम करण्याचा प्रस्ताव शासनाकडे अंतिम मंजुरीकरीता तत्काळ पाठविण्याबाबतचा लेखी अहवाल प्रभारी वैद्यकीय आरोग्याधिकारी यांनी नुकताच आस्थापना विभागाकडे पाठविलेला आहे. त्याची पडताळणी करून प्रशासक तथा आयुक्त रजेवरून आलेनंतर लवकरात लवकर हा प्रस्ताव शासनाकडे अंतिम मंजुरीसाठी पाठविण्यात येईल असे उपायुक्त विजयकुमार मुंडे यांनी आश्वासन दिले. ११) महापालिकेतील सर्व कर्मचाऱ्यांना घरकुल योजना राबविण्याबाबत सदर संयुक्त बैठकीमध्ये चर्चा होऊन महापालिकेच्या अखत्यारीतील रिकाम्या भुखंडाबाबत नगररचना विभागास पत्र पाठवुन त्यांचेकडून माहिती घेऊन प्रकल्प विभाग, बांधकाम विभाग व घनकचरा व्यवस्थापन विभाग यांनी सदर माहिती संकलित करून महानगरपालिकेस लवकरात लवकर सादर करावी. तसेच त्यामध्ये ज्या कर्मचाऱ्यांना महापालिकेमार्फत घरे उपलब्ध करून दिलेली नाहीत अशा सर्व कामगार-कर्मचाऱ्यांना महापालिकेमार्फत घरे बांधुन देणेबाबतचा निर्णय घेण्यात येईल. तसेच बाहेरून येणाऱ्या अधिकाऱ्यांकरीता स्वतंत्र निवासाची व्यवस्था या प्रकल्पामध्ये करण्यात यावी असे ठरविण्यात आले. रिकाम्या भुखंडाबाबतचा अहवाल प्राप्त झालेनंतर याबाबत चर्चा करून पुढील निर्णय घेणेबाबत ठरले आहे.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी उपायुक्त (सामान्य) विजयकुमार मुंडे, लेखाधिकारी सचिन धस, सहाय्यक आयुक्त तथा आस्थापना प्रमुख मेहेर लहारे, प्रकल्प अभियंता राजेंद्र मेहेत्रे, मनपा लेखा विभागातील कर्मचारी अनिल लोंढे, तसेच युनियनच्या वतीने अध्यक्ष जितेंद्र सारसर व बाबासाहेब मुदगल, आनंदराव वायकर, महादेव कोतकर, बाबासाहेब राशिनकर, राहुल साबळे, नंदुकुमार नेमाणे, विठ्ठल उमाप, अनंत लोखंडे इत्यादींनी संयुक्त बैठकीमध्ये सहभाग घेतला होता.

# ऐतिहासिक ठेवा पुढील पिढीच्या माहितीसाठी एकत्रित प्रयत्नाची गरज

## अलतमश जरीवाला यांचे प्रतिपादन; अहमदनगर युवा फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने चादर अर्पण करून अभिवादन

नगर - जगात एकमेव शहर असा आहे ज्याला स्थापन दिवस लाभलेला आहे. म्हणून आज आम्ही सर्व नगरकरांना स्थापन दिवस साजरा करण्याच्या एक अभिमान वाटतो. अहमदनगर शहराची स्थापना कधी व कोणी केली याची इतिहासात नोंद असल्याने गेल्या ५०० पेक्षा जास्त वर्षाच्या अहमदनगरचा स्थापना दिवस साजरा होतो ही ऐतिहासिक बाब आहे. त्याकाळी अहमदनगर शहराची गणना जगातील मोजक्याच शहराबरोबर करण्यात येत असत. इतके वैभवशाली असे अहमदनगर होते. काळाचे उगाच अनेक ती स्थित्यांतरे पाहिलेल्या अहमदनगर शहरातील सर्व ऐतिहासिक वस्तूंचे जतन करणे गरजेचे आहे. हा ऐतिहासिक ठेवा पुढील पिढीला माहिती होण्यासाठी सर्वांच्या एकत्रित प्रयत्नाची गरज आहे त्यासाठी आम्ही पुरातन विभागाशी संपर्क करून या ऐतिहासिक वास्तूंच्या जतन करण्यासाठी प्रयत्न करू तसेच अहमदनगर शहराचे संस्थापक अहमद निजामशहा यांच्या कबरीवर जाणारा रस्ता करण्यासाठी पाठपुरावा करू, असे प्रतिपादन अहमदनगर युवा फाउंडेशन ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष अलतमश जरीवाला यांनी केले.



अहमदनगर शहराच्या ५३५ वा स्थापना दिनानिमित्त शहराच्या संस्थापक अहमदनगर युवा फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने चादर अर्पण करून दुवा करण्यात आली.

अहमदनगर शहराच्या ५३५ वा स्थापना दिनानिमित्त शहराच्या संस्थापक अहमदनगर युवा फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने चादर अर्पण करून दुवा करण्यात आली. यावेळी इतिहासाचे अभ्यासक भूषण देशमुख, मन्सूर शेख, उबेद शेख, कलीम रामपुरवाला, भैरवनाथ वाकडे, अथर खान, विजयसिंह होलम, डॉक्टर कमर सुरूर, संध्या मेढे, आर्किटेक फिरोज शेख, आसिफ खान, अफजल सय्यद, समीर पठाण, शफकत सय्यद, फिरोज शेख, हाजी सलीम सहारा, नईम सरदार वाईद शेख, अबुजर सय्यद, कैफ शेख उपस्थित होते.

पुढे बोलताना जरीवाला म्हणाले की, अहमदनगर शहराला मोठी ऐतिहासिक परंपरा आहे त्याकाळी या शहराची इतकी भरभराट झाली होती की व्यापार कला राजेशाहीची चर्चा संपूर्ण जगभर होते. एक आधुनिक व व्यावसायिक शहर म्हणून ओळख होती. शहराच्या इतिहास सुरुवातीपासूनच रोमांचकारी राहिलेला आहे अनेक देशी-विदेशी इतिहासकारांनी अहमदनगर शहराचे वर्णन आपल्या ग्रंथात केले आहे. आपण आपल्या शहराच्या अभिमान बाळगायला पाहिजे व ऐतिहासिक ठेवा असलेल्या या वस्तूंचे जतन केले पाहिजे असे, आवाहन यावेळी केले गेले.

यावेळी उबेद शेख, भूषण देशमुख, अथर खान, फिरोज शेख, नईम सरदार, शफकत सय्यद, संध्याताई मेढे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रस्ताविकात अबिद खान यांनी शहराची स्थापना व इतिहासातील महत्त्वाच्या घटना सांगितली. समीर पठाण यांनी आभार मानले.

# 'मंगलदिप मल्टीस्टेट'च्या कर्जदारास ६ महिने कैद व ६१,००० रुपये दंडाची शिक्षा

नगर - अहमदनगर येथील अति.मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने कर्जदार कमल विठ्ठल गाली, रा. अहिल्यानगर यास निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट अॅक्ट कलम १३८ अन्वये दोषी ठरवून ६ महिने कैद व ६१,००० दंडाची शिक्षा ठोठावली आहे. दंडाची रक्कम न भरल्यास २ महिने कैद भोगण्याची शिक्षा देखील दिलेली आहे. तसेच नुकसान भरपाई रक्कम फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांना देण्याचा आदेश दिलेला आहे. कमल विठ्ठल गाली यांनी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी, यांचेकडुन घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीपोटी दिलेला धनादेश वटला नाही व नोटीस मिळुनही धनादेशाची रक्कम दिली नाही त्यामुळे संस्थेने कमल विठ्ठल गाली यांचे विरूद्ध न्यायालयात फिर्याद दाखल केलेली होती. संस्थेतर्फे देण्यात आलेला पुरावा ग्राह्य धरून न्यायालयाने कर्जदार कमल विठ्ठल गाली यांना वरील प्रमाणे शिक्षा सुनावली आहे.

संस्थेच्या वतीने सागर लक्ष्मण फुलारी, भाउसाहेब वाघुले व रामचंद्र पानसरे यांच्या साक्ष महत्वाच्या ठरल्या. फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांचे करीता अॅड. सुहास. एस. टोणे यांनी न्यायालयात बाजु मांडली. त्यांना अॅड. अमित अडागळे व अॅड विलास ढोणे, अॅड. गौरव हरबा, अॅड. ओम गुंड यांनी सहकार्य केले.

# ‘साम, दाम, दंड, भेद’ नीतीने नक्षलवाद संपवण्याचे यशस्वी काम सरकारने केले

## दिग्दर्शक अमरनाथ झा यांचे प्रतिपादन; व्याख्यानातून उलगडला द बस्तर स्टोरी चित्रपटाचा पट



विचार भारती आयोजित ग. म. मुळे स्मृती व्याख्यानमालेचे वक्ते द बस्तर स्टोरी चित्रपटाचे दिग्दर्शक अमरनाथ झा यांचा सत्कार करताना राजेंद्र पाचे. समवेत नाट्यकर्मी दीपक करंजीकर, नरेंद्र फिरोदिया व गिरीश अगरवाल आदी.

नगर – देशातील नक्षलवाद्यांच्या कारवाईत देशाचा खूप मोठ्या प्रमाणात वेळ व पैसा खर्च झाला आहे. तब्बल ४१ लाख करोड रुपये आजपर्यंत बरबाद झाले असून, तब्बल १५ हजार सैनिक मारले गेले आहे. देश बाहेरील शत्रुपेक्षा देशातील शत्रूने आपले खूप नुकसान केले आहे. आजही बस्तर भागात प्रत्येक चार किलोमीटरवर सीआरपीएफचा छावण्या आहेत. तेथे ५० किमीचा रस्ता बनवण्यासाठी ६ वर्ष लागले तर काम चालू असताना ३० ते ४० जवान शहीद झाले आहेत. अस खतरनाक हा परिसर आहे. २००५ सालापासून देशातील व छत्तीसगढच्या सरकारच्या सहकार्याने त्यांच्या कारवाया वाढल्या. त्यावेळीचे सरकार स्वतःचे राजकीय नुकसान होऊ न देता गप्प बसत देशाचे नुकसान होऊन देत नक्षलवाद्यांना साथ देत. पण देशातील वर्तमान सरकार साम, दाम, दंड, भेद या नीतीवर काम करत नक्षलवाद संपवण्याचे यशस्वी काम करत आहे. त्यामुळे नक्षलवादी स्वतःहून परिवर्तीत होत आहेत. युवक बंदुका फेकून कामधंद्याला लागले आहेत. स्थानिकांही सहकार्य कमी केले आहे. हे देशातील वर्तमान सरकारचे मोठे यश आहे, असे प्रतिपादन द बस्तर स्टोरी चित्रपटाचे दिग्दर्शक व नक्षली जीवन जगलेले अमरनाथ झा यांनी केले.

विचार भारती आयोजित ग. म. मुळे स्मृती व्याख्यानमालेच्या तृतीय दिनी अमरनाथ झा यांची वास्तव नक्षलवादाचे या विषयावर नाट्यकर्मी दीपक करंजीकर यांनी मुलाखत घेतली. यावेळी प्रमुख पाहुणे उद्योजक नरेंद्र फिरोदिया, क्रेडाईचे अध्यक्ष गिरीश अगरवाल, रा.स्व.संघाचे जिल्हा संघचालक वाल्मिक कुलकर्णी व्यासपीठावर उपस्थित होते. तसेच भारत भारतीच्या राष्ट्रीय सचिव साधना राव, प्रदेश सचिव डॉ.धर्मेंद्र राजवद आदींसह विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते.

यावेळी नक्षलवाद या महत्वच्या विषयावर अमरनाथ झा व दीपक करंजीकर यांनी अत्यंत उद्बोधक चर्चा करत थरारक व रंगतदार माहिती उपस्थितांना दिली. झा यांनी द बस्तर स्टोरी चित्रपटाच्या निर्मितीचा पट यावेळी उलगडला.

अमरनाथ झा पुढे म्हणले, देशातील सर्व डावे पक्षांचा एकाच उद्देश आहे, तो म्हणजे पूर्ण देशात लोकशाहीच्या जागी कम्युनिझम पसरवणे. नक्षली विचाराच्या माओवादी व कम्युनिस्ट गोड व प्रेमळ भाषेत गरिबांच्या न्याय व हिताच्या गोष्टी करून संवेदनशील नागरिकांना आपल्याशी जोडून घेतात. माझ्या बरोबरही हेच झाले. मी नाटकात काम करत असल्याने छोटे नाटक करण्यासाठी त्यांनी मला बस्तर भागात नेले. त्यांच्या क्रांतीच्या भाषेने व कामाने मी प्रभावित होऊन त्यांच्या सामील होत स्वतः ला भगतसिंग समजायला लागलो होतो. पण त्यांचे काम गरिबांच्या हितासाठी नसल्याचा विरोधाभास मला दिसला. गावातील अशिक्षित, गरजू शेतकरी यांच्या हातात ते बंदुका देत असत, असे त्यांचे काम खूप खतरनाक होते. त्यामुळे तेथून हळूहळू बाहेर पडत गेलो. ते दिवस दिवास्वप्ना सारखे होते. या नक्षलींना सहकार्य करणारी मोठी ताकद आजही आहे. त्यांच्या त जनजागृती करणे आवश्यक आहे. मी काहींना परिवर्तीत केले आहे.

बस्तरवर जेव्हा चित्रपट काढण्याचे ठरवले तेव्हा कहाणीसाठी पुन्हा बस्तरमध्ये गेलो. त्यावेळी ज्यांच्या पतीचे ३५ तुकडे करून मारले अशा काही महिलांना भेटलो. त्यांची वेदनादायी घडलेली घटना ऐकतानाच या महिलांची सत्यता व व्यथा द बस्तर स्टोरीमध्ये मांडण्याचे ठरवले, असे सांगून चित्रपट निर्मितीचा पट उलगडला.

यावेळी दीपक करंजीकर यांनी अभ्यासपूर्ण प्रश्न विचारत अमरनाथ झा यांच्या चर्चा केली. ते म्हणाले, ज्यांनी प्रत्यक्ष नक्षली जीवन जगून त्या चक्रव्युवातून सुरक्षितपणे बाहेर येत तेथील सत्य परिस्थिती चित्रपटातून मांडण्याचे धाडस करणारे अमरनाथ झा हे असाधारण आहेत. सर्व विरोधांवर मात करून त्यांनी सत्यता सर्वांसमोर ठेवली. आज ते देशहितासाठी काम करत आहेत. प्रारंभी अहिल्यानगर गौरव गीत व विचार भारतीच्या कार्याची ध्वनी चित्रफित प्रसारित करण्यात आली. विचार भारतीचे सदस्य डॉ.निळकंठ ठाकरे यांनी वक्त्यांचा व पाहुण्यांचा परिचय दिला. सुनील नागोरी यांनी आभार मानले. यावेळी विचार भारतीचे प्रशांत आढाव, राजेश झंवर, उमेश खिंदारे, अंकुश गोळे, मिलिंद कुलकर्णी आदींसह सदस्य उपस्थित होते.



कळमकर ॲकॅडमीत दहावीच्या परीक्षेत यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

# तुमच्यातील जे काही सर्वोत्तम आहे, ते प्रकट करणे म्हणजे खरे शिक्षण

## दादाभाऊ कळमकर यांचे प्रतिपादन; कळमकर ॲकॅडमीतर्फे गुणवंतांचा सन्मान

नगर – सध्याच्या काळात हार्डवर्कपेक्षा स्मार्टवर्क करणे गरजेचे आहे. शिक्षणासोबत आयुष्यात यशस्वी होणे गरजेचे आहे. करिअर निवडल्यानंतर जिद्द, चिकाटीसह त्या क्षेत्रातील परिपूर्ण ज्ञान मिळविण्यासाठी सदैव प्रयत्न करावेत. पालकांनी मुलांशी संवाद साधणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी स्वत:ला समाधान देणारे करिअर निवडावे; म्हणजे त्यांना अभ्यासामध्येही गोडी लागते. पालक आणि विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमता पाहून अभ्यासक्रम निवडावा. प्रत्येकाने करिअर निवडताना स्वत:ची कौशल्ये, आवड-निवड, क्षमता यांचा विचार करून करिअर निवडावे. आज अनेक नवी क्षितिजे तुमच्यापुढे आहेत. आमच्या काळी त्यांना मर्यादा होती, असे माजी आमदार दादाभाऊ कळमकर यांनी विद्यार्थ्यांना म्हणाले.

मानवी जीवनाचा सर्वांगीण विकास हा त्याच्या शिक्षणावरच अवलंबून असतो. जो जितका शिक्षणामध्ये ज्ञान अर्जित करतो, तो तितकाच यशाच्या शिखरावर जाऊन बसतो. शिक्षणाची दिशा ही माणसाच्या संपूर्ण विकासासाठी आणि त्याच्या मूलभूत अधिकारांसाठी महत्त्वाची असते. तुमच्यातील जे काही सर्वोत्तम आहे, ते प्रकट करणे म्हणजे खरे शिक्षण होय, असा सल्ला कळमकर ॲकॅडमीतर्फे आयोजित दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांना उपस्थितांनी दिला.

यावेळी दहावीच्या परीक्षेमध्येमध्ये विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार माजी आमदार दादाभाऊ कळमकर, ओला मॅडम, प्रा. गिरीश कुकरेजा, पुष्पाताई बोरुडे, वंदनाताई बोरुडे, सीए ज्ञानेश्वर काळे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी चैतन्य अकादमीचे संचालक चैतन्य कळमकर म्हणाले, कळमकर ॲकॅडमी ही ॲकॅडमी नसून एक विचार आहे. ज्यामध्ये विद्यार्थ्यांच्या परिपूर्ण विकासावर भर दिला जातो. पुस्तकी ज्ञानाबरोबर प्रात्यक्षिकावर भर देण्यात येतो. विद्यार्थ्याला विषय सहज आणि सोप्या भाषेत समजावा, यासाठी वेळोवेळी सराव परीक्षा घेतल्या जातात.

ॲकॅडमीतर्फे विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या स्वराज बाळासाहेब एकशिंगे ९६%, वेदांती सोमनाथ काळे ९५%, प्रार्थना सुनील हिवाळे ९४%, राजनंदिनी ज्ञानेश्वर काळे ९१%, अनुष्का विश्वास तट ९१% या विद्यार्थ्यांनी विशेष गुणांसह यश संपादन केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# प्रा. रवींद्र काळाने यांना डॉक्टरेट पदवी



नगर – श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील परिक्रमा इंजिनिअरिंग कॉलेजचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा.रवींद्र काळाने यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड मध्ये शारीरिक शिक्षण (महाराष्ट्रातील शालेय स्तरावरील बेसबॉल खेळाडूंच्या मूल्यमापनासाठी कसोटीचे विकसन व प्रामाणिकरण करणे) या विषयात डॉक्टरेट ही पदवी मिळाली आहे.

हि पदवी प्राप्त करण्यासाठीं त्यांना डॉ.नल्ला भास्कर रेड्डी यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक बबनराव पाचपुते, परिक्रमा शैक्षणिक संकुलाच्या अध्यक्षा डॉ. सौ.प्रतिभाताई पाचपुते, सचिव विक्रमसिंह पाचपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रतापसिंह पाचपुते, अतिरिक्त कार्यकारी अधिकारी व मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा.अनिल पुंड, अॅकॅडमी डायरेक्टर सौ.इंद्रायणी पाचपुते, अॅकॅडमी चे डायरेक्टर प्रा.डॉ. संजीव कदम, प्राचार्य मोहन धगाटे, प्राचार्य डॉ.सुनील निर्मळ, प्रा.डॉ. सुदर्शन गिरमकर, प्राचार्य डॉ.रमेश शिंदे, प्राचार्य डॉ.पांडुरंग इथापे, प्राचार्य डॉ.प्रशांत सूर्यवंशी आदींनी अभिनंदन केले.

## मोटारसायकलची चोरी

नगर – घरासमोर रस्त्याच्या कडेला हॅन्डल लॉक करुन लावलेली बजाज कंपनीची पल्सर २२० मोटारसायकल (क्र. एम एच २० एफ के ७६ ६८) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. ही घटना सावेडी परिसरातील भिस्तबाग येथील पंचवटीनगर मधील सप्तशृंगी कॉलनी येथे २५ मे रोजी रात्री घडली.

याबाबत अक्षय शामकांत राऊत (वय २८ रा. सप्तशृंगी कॉलनी, पंचवटीनगर, भिस्तबाग) यांनी दिलेले फिर्यादीवरुन तोफखाना पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

# मंगलदिप मल्टीस्टेटच्या कर्जदारास १ महिने कैद व ८८,००० रुपये दंड

नगर – अहमदनगर येथील अति.मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने कर्जदार डॉली विनोद आनंद, रा. तारकपुर, अहिल्यानगर यास निगोशिएबल इंस्ट्रूमेंट अॅक्ट कलम १३८ अन्वये दोषी ठरवून १ महिना कैद व ८८,००० रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे. दंडाची रक्कम न भरल्यास १ महिना कैद भोगण्याची शिक्षा देखील दिलेली आहे. तसेच नुकसान भरपाई रक्कम फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांना देण्याचा आदेश दिलेला आहे. डॉली विनोद आनंद यांनी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी, यांचेकडुन घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीपोटी दिलेला धनादेश वटला नाही व नोटीस मिळुनही धनादेशाची रक्कम दिली नाही त्यामुळे संस्थेने डॉली विनोद आनंद यांचे विरूद्ध न्यायालयात फिर्याद दाखल केलेली होती. संस्थेतर्फे देण्यात आलेला पुरावा ग्राहय धरूण न्यायालयाने कर्जदार डॉली विनोद आनंद यांना वरील प्रमाणे शिक्षा सुनावली आहे. संस्थेच्या वतीने सागर लक्ष्मण फुलारी, भाउसाहेब वाघुले व रामचंद्र पानसरे यांची साक्षी महत्वाची ठरली. फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांचे करीता अॅड. सुहास. एस. टोणे यांनी न्यायालयात बाजु मांडली. त्यांना अॅड. अमित अडागळे व अॅड. विलास ढोणे, अॅड. गौरव हरबा, अॅड. ओम गुंड यांनी सहकार्य केले.

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील मुला-मुलींना प्रवेश देऊन १२ वी पर्यंतचे शिक्षण पूर्णतः मोफत

नगर – भारतीय जैन संघटना (बीजेएस) यांच्यावतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही, महाराष्ट्रातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील मुला-मुलींना शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये प्रवेश देऊन १२वी पर्यंतचे शिक्षण पूर्णतः मोफत दिले जाणार आहे. तसेच भोजन, निवास, वैद्यकीय व इत्यादी सुविधा शिक्षण पूर्ण होण्यापर्यंत मोफत उपलब्ध करण्यात येतील. यासाठी इयत्ता ५ वी व ६ वी मध्ये १०० मुला – मुलींना प्रवेश देण्यात येणार असून ७ जून पर्यंत अर्ज वाघोली शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्प, पुणे-नगर रोड, बकुरी फाटा, पुणे येथे सादर करण्यात यावे. या साठी आवश्यक कागदपत्र व पालकांचे संमती पत्र अनिवार्य असून, इतर माहिती साठी बीजेएस प्रकल्प व्यवस्थापक सुरेश साळुंके ९४२३ ०७४ २३४, वस्तीगृह व्यवस्थापक, साईनाथ रापतवार ९९७० ००१ ०११, प्रमुख अधीक्षक, रामदास औटे ९४२० ७८६ २१२, आणि सौ. सविता सुतार ९८६० १०५ ३२६ यांच्याशी संपर्क साधावा.

बीजेएसचे संस्थापक शांतिलाल मुथ्था हे गेली ४० वर्षांपासून अशा प्रकारचे सामाजिक कार्य करीत आहेत. लातूर भूकंपातून १२०० मुलांना पुणे येथे आणून त्यांचे पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करून त्यांनी या कार्याची सुरुवात केली होती. १९९७ सालापासून मेळघाट परिसरातील आदिवासी विद्यार्थ्यांना पुणे येथे शिक्षणासाठी आणून त्यांना शिक्षणाबरोबरच सक्षम नागरिक बनविण्यामध्ये बीजेएसने यश मिळवले आहे. आत्तापर्यंत ३००० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पुनर्वसन बीजेएसने केले असून, या विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी पिढीचे चेंज एजंट बनविण्यामध्ये बीजेएसला यश प्राप्त झाले आहे. आज आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुला-मुलीना ही सुविधा प्राप्त करून देण्यासाठी बीजेएसचे राष्ट्रीय अध्यक्ष नंदकिशोर साखला, मॅनेजिंग डायरेक्टर कोमल जैनसह संपूर्ण बीजेएसची टीम कार्यरत आहेत असे आदेश चांगेडिया राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य यांनी सांगितले आहे.

# सहकार हा लोकशाहीचा खरा आत्मा

## गणेश पुरी यांचे प्रतिपादन; नगर सीए शाखेतर्फे सहकार प्रशिक्षणाचे आयोजन





सीए अहमदनगर शाखा व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने २ दिवसीय आयोजित सीए सहकार प्रशिक्षण उत्साहात पार पडले.

नगर – सहकार हा लोकशाहीचा खरा आत्मा असून, सामूहिक नेतृत्व आणि पारदर्शक कार्यपद्धती हाच त्याचा गाभा आहे, असे उद्घाटनप्रसंगी बोलताना जिल्हा उपनिबंधक गणेश पुरी यांनी सांगितले. त्यांनी उपस्थितांना सहकाराची तत्त्वे, संस्थात्मक जबाबदाऱ्या व सध्याच्या बदलत्या युगात सहकाराची भूमिका यांची स्पष्ट व समजावून देणारी ओळख करून दिली.

सीए अहमदनगर शाखा व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने २ दिवसीय आयोजित सीए सहकार प्रशिक्षण उत्साहात पार पडले. यावर्षी एकूण २०० पेक्षा जास्त सहकारी बँका व पतसंस्था यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या प्रशिक्षणाचे उद्घाटन जिल्हा उपनिबंधक गणेश पुरी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमात सहकार क्षेत्रातील विविध विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

श्रीकांत जाधव यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) या आधुनिक तंत्रज्ञानावर व्याख्यान दिले व त्याचा सहकारी संस्थांवरील प्रभाव उलगडून सांगितला.

डी. जी. काळे यांनी रिझर्व्ह बँकेच्या सहकारी बँकांकडून असलेल्या अपेक्षा या विषयावर मार्गदर्शन केले. सीए अभयकुमार कटारिया यांनी आफरातफार व गंभीर बाबी – कार्यपद्धतीत सुधारणा यावर प्रकाश टाकला. सीए रोहित बोरा यांनी कर्जाचे दस्तऐवजीकरण याविषयी महत्वाच्या बाबी समजावून सांगितल्या. संदीप गदीया यांनी सायबर गुन्हे व त्यावर उपाय यावर वास्तवाधारित सादरीकरण केले. सीए सुनील नागावकर यांनी एनपीए – कारणे व उपाय यावर स्पष्ट विचार मांडले. सीए अमित फिरोदिया यांनी सहकारी संस्थांपुढील आजच्या काळातील आव्हाने यावर विचार मांडले व संभाव्य उपायांचा ऊहापोह केला.

नगर सीए शाखेने आयोजित केलेल्या या शिबिराला सहकारी आर्थिक संस्थाचे पदाधिकारी, संचालक, कर्मचारी, लेखा परीक्षक आणि सीए उपस्थित होते. या चर्चासत्रातून उपस्थितांनी सहकार चळवळीतील बदलते तंत्रज्ञान, आर्थिक नियमावली आणि धोरणात्मक बाबींबाबत महत्वपूर्ण माहिती मिळवली.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक अध्यक्ष सीए प्रसाद पुराणिक यांनी केले. सूत्रसंचालन सचिव सीए महेश तिवारी व सदस्य सीए सुनंदा रच्चा यांनी केले. उपाध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अहिल्यनगर शाखेचे सीए अभयकुमार कटारिया व इतर सदस्य यांचे सहकार्य लाभले. उपस्थितांनी अशा कार्यक्रमांच्या सातत्यपूर्ण आयोजनाची गरज व्यक्त केली.

# युवा धोरण समितीच्या सदस्यपदी आमदार सत्यजीत तांबे यांची नियुक्ती



नगर – महाराष्ट्र शासनाने राज्यातील युवकांसाठी नव्या पिढीच्या गरजांनुसार समकालीन आणि प्रभावी युवा धोरण तयार करण्यासाठी उच्चस्तरीय समिती गठीत केली आहे. या समितीच्या अध्यक्षपदी क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे आहेत, तर आमदार सत्यजीत तांबे यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या २१ सदस्यीय समितीत विधिमंडळाचे सदस्य, विविध शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी तसेच राष्ट्रीय आणि राज्य युवा पुरस्कार प्राप्त प्रतिनिधी यांचा समावेश आहे.

आ. सत्यजीत तांबे हे सभागृहातील तरुण व अभ्यासू नेतृत्व म्हणून ओळखले जातात. युवकांच्या प्रश्नांवर त्यांची सुस्पष्ट भूमिका असून, त्यांनी अनेकदा विधानमंडळात युवकांचे मुद्दे प्रभावीपणे मांडले आहेत. २०१२ मध्ये तयार करण्यात आलेले महाराष्ट्र राज्य युवा धोरण आजच्या बदलत्या सामाजिक, आर्थिक व तांत्रिक परिस्थितीत कालबाह्य झाले आहे, असे शासनाचे मत आहे. त्यामुळे या जुन्या धोरणाचा सविस्तर आढावा घेऊन नव्या धोरणाची रचना करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या नव्या धोरणात युवकांसाठी शिक्षण, कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता, क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि नेतृत्व विकास आदी बाबींचा समावेश करण्यात येणार आहे. या समितीचा कार्यकाल तीन महिन्यांचा असून, या कालावधीत ती राज्यातील विद्यमान धोरणाचा अभ्यास करून, सुधारित धोरणासंदर्भात शासनाला शिफारशी करणार आहे. नव्या धोरणासाठी लागणाऱ्या योजनांची आखणी, त्यासाठीचा वित्तीय आराखडा आणि केंद्र शासनाच्या धोरणांशी सुसंगती यांचाही समावेश या अभ्यासात असेल. राज्यातील युवकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा निर्णय महत्त्वपूर्ण असून, आमदार सत्यजीत तांबे यांचे अनुभव आणि कार्यपद्धती या प्रक्रियेला निश्चितच परिणामकारक ठरवतील, असा विश्वास राज्यातील युवकांमध्ये व्यक्त होत आहे.

राज्याच्या युवकांसाठी प्रभावी व वास्तववादी धोरण तयार करणे ही एक मोठी जबाबदारी असून, मी ती मनापासून पार पाडणार आहे. आजचा युवक केवळ पारंपरिक शिक्षणापुरता मर्यादित नाही. तो स्टार्टअप्स, तंत्रज्ञान, कला, पर्यावरण, समाजसेवा, क्रीडा यांसारख्या अनेक क्षेत्रांत झेप घेत आहे. अशा युवा शक्तीला दिशा देणारे धोरण तयार करणे हे काळाची गरज आहे, असे आ. सत्यजीत तांबे म्हणाले.


## अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या., अहमदनगर

मुख्य कार्यालय :- महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड, उपनिबंधक, ता. नगर कार्यालयाशेजारी, अहमदनगर. फोन २३२६९१४

जा.क्र. पतसंस्था फेडरेशन / ९६२ / सन २०२५ — दिनांक :- २७/०५/२०२५

### स्थावर मालमत्ता विक्रीचा जाहीरनामा

ज्या अर्थी, **ओम नागरी सहकारी पतसंस्था मर्या., भिंगार, ता.जि. अ.नगर** यांनी खाली नमुद केलेल्या थकबाकीदारांविरुद्ध महाराष्ट्र सह. संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१/९८ ब अन्वये वसुली दाखले मिळविले असून त्यांच्यावर रितसर मागणी नोटीस बजावली आहे. तरीही त्यांनी त्यांच्याकडील थकबाकीची रक्कम भरली नसल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७/(१०) नुसार मला मा. जिल्हा उप-निबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर. यांनी प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरून मी **एम. ए. शेख** विशेष वसुली व विक्री अधिकारी खालील नमुद स्थावर मालमत्ता थकीत येणे रक्कम वसुलीकरिता जाहीर लिलावाने विक्री करीत आहे. तरी स्थावर मालमत्ता लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी नमुद ठिकाणी तारखेस व वेळेस उपस्थित रहावे.

| अ.नं. | थकबाकीदाराचे नाव | गांव | स्थावर मिळकत | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | वसुली दा रक्कम | गट नं. | क्षेत्र हे आर | आकार रु पै | वसुली दा. रक्कम | | | |
| | | | | | | | पूर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
| १ | कर्ज – निलेश पोपट दळवी यांची मिळकत<br>जामि – यासीन नासर अरब<br>जामि – नासर महंमद अरब<br>जामि – सुहास त्रिंबक मोहरकर<br>जामि – अशोक मुरलीधर गुजर | सोनेवाडी (चास) ता. नगर | ४५१८४७/- + होणारे व्याज + इतर खर्च | १० | ०.३४ | ३.७१ | मुळ नकाशाप्रमाणे | | | |

लिलावाचे ठिकाण व वेळ : https://eauction.gov.in या सांकेतिक स्थळावर (**ओम नागरी सहकारी पतसंस्था मर्या., भिंगार, ता.जि. अ.नगर**). **दि. २७/०६/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता.** हा आदेश प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत वसुल पात्र रक्कम व त्यावरील येणे व्याज न भरल्यास वरीलप्रमाणे जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचा जाहिर लिलाव करण्यात येईल व पतसंस्थेस येणे असलेल्या वसुल पात्र रक्कमेचा भरणा केला जाईल. वरील स्थावर जाहिर लिलावाने विक्री करुन ही वसुल पात्र रक्कमेएवढी रक्कम न आल्यास जामिनदारांकडुन वरील प्रमाणेच प्राधान्याने वसुली केली जाईल, याची जामिनदाराने नोंद घ्यावी.

**लिलावाच्या दिवशी दि. २७/०६/२०२५** रोजी लिलावात कोणीही भाग न घेतल्यास **फेर लिलाव नं. २ दि. ३०/०७/२०२५ रोजी सकाळी : ११.३० वाजता** संस्थेच्या कार्यालयात होईल. तसेच या ही लिलावात बोली बोलण्यास अथवा योग्य किमंत न आल्यास **अंतिम लिलाव हा दि. ३०/०८/२०२५ रोजी सकाळी : ११.३० वाजता** https://eauction.gov.in या सांकेतिक स्थळावर (**ओम नागरी सहकारी पतसंस्था मर्या., भिंगार, ता.जि. अ.नगर**) या ठिकाणी होईल याची नोंद घ्यावी.

स्थळ :- अहमदनगर
दिनांक :- २७/०५/२०२५

**(एम. ए. शेख)**
विशेष वसुली व विक्री अधिकारी
अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या., अहमदनगर


# महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे यांच्यावतीने जयंत येलुलकर यांना उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार प्रदान



मसाप पुणे यांच्यावतीने जयंत येलुलकर यांना उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार प्रदान करण्यात आला

नगर – महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे यांच्या वतीने रत्नाकर कुलकर्णी स्मरणार्थ उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार रसिक ग्रुपचे अध्यक्ष व म.सा.प सावेडी शाखेचे प्रमुख कार्यवाह जयंत येलुलकर यांना महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष ज्येष्ठ विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे यांच्या हस्ते पुणे येथे प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे ज्येष्ठ साहित्यिक लक्ष्मण गायकवाड, भारती विद्यापीठाचे कुलगुरू व परिषदेच्या विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष डॉ. शिवाजीराव कदम, कार्याध्यक्ष व साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह सुनिताराजे पवार, कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी, उपाध्यक्ष विद्याधर अनास्कर, राजीव बर्वे, डॉ.मंदा खांडगे, डॉ.गीताली वि. म व्यासपीठावर उपस्थित होते.

स्मृतिचिन्ह, ३ हजार रुपये, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप असून साहित्य क्षेत्रात प्रामाणिकपणाने कार्य करणाऱ्या व्यक्तीस दिला जाणारा हा राज्यस्तरीय पुरस्कार साहित्य क्षेत्रात अत्यंत मानाचा समजला जातो.

याप्रसंगी कार्यकारिणी सदस्य चंद्रकांत पालवे, राजन लाखे, शिरीष चिटणीस, वि. दा. पिंगळे, प्राचार्य तानसेन जगताप, प्रा. शशिकला पवार, अंजली कुलकर्णी, प्रमोद आडकर, ज्योत्स्ना चांदगुडे, मृणालिनी कानिटकर, माधव राजगुरू, सुरेश देशपांडे,कल्याण शिंदे, पद्माकर कुलकर्णी, जे. जे. कुलकर्णी, रवींद्र बेडकीहाळ, महाराष्ट्रातील साहित्यिक उपस्थित होते

यावेळी रावसाहेब कसबे, लक्ष्मण गायकवाड यांनी साहित्य परिषदेच्या कार्याचा गौरव करतांना आपल्या विचारांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

प्रा. मिलिंद जोशी यांनी प्रास्ताविक केले. सुनिताराजे पवार यांनी पुरस्कारार्थींचा परिचय करून देताना स्वागत केले. विनोद कुलकर्णी यांनी आभार मानले. ज्येष्ठ कवयित्री अंजली कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# जिल्हा पोलीस दलातील ४०० हून अधिक कर्मचाऱ्यांच्या जिल्हांतर्गत झाल्या बदल्या

**एलसीबीत जाण्यासाठी इच्छुकांचा हिरमोड, एकालाही मिळाली नाही नियुक्ती**

नगर – जिल्हा पोलीस दलातील पोलीस अंमलदारांच्या प्रशासकीय बदल्यांसाठी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या नेतृत्वाखाली २८ मे रोजी पोलीस मुख्यालयात भव्य बदली दरबार आयोजित करण्यात आला. सुमारे ४०० पेक्षा अधिक अंमलदारांच्या बदल्यांची ही प्रक्रिया दुपारनंतर सुरू झाली आणि रात्री उशिरापर्यंत चालू होती.

श्रेणी पोलीस उपनिरीक्षक ते पोलीस शिपाई व चालकांपर्यंतच्या विविध पदांवरील अंमलदारांच्या बदल्या करण्यात आल्या. त्यामध्ये श्रेणी पोलीस उपनिरीक्षक १३, सहायक फौजदार ४३, पोलीस हवालदार ९५, पोलीस नाईक २२, पोलीस शिपाई १९० आणि पोलीस चालक ३७ अशा विविध पदांवरील अंमलदारांचा समावेश होता. बदलीसाठी पात्र अंमलदारांकडून पूर्वीच अर्ज मागवण्यात आले होते. त्यामध्ये प्रत्येक अंमलदाराला बदलीसाठी तीन पसंती ठिकाणे नमूद करण्याची संधी देण्यात आली होती. बुधवारी दरबारात या पसंतीचा विचार करून अनेक अंमलदारांना समाधानकारक बदली देण्यात आली.

काही अंमलदारांनी आपल्या पसंतीनुसार ठिकाण मिळाल्याने समाधान व्यक्त केले, तर काहींनी पसंतीचा विचार न झाल्याने नाराजी व्यक्त केली. पोलीस अधीक्षक घार्गे यांनी पदभार स्वीकारताच संपूर्ण बदल्यांची प्रक्रिया राबवली असून ती पारदर्शक आणि व्यवस्थित पार पडली.

बदल्यांमुळे अनेक अंमलदारांना त्यांच्या पसंतीची ठिकाणे मिळाली असली तरी काहींचा हिरमोडही झाला. विशेषतः एलसीबीच्या इच्छुकांसाठी हे यंदाचे वर्षसुध्दा अपेक्षाभंगाचे ठरले आहे. बदली दरबारात पोलीस अधीक्षक घार्गे यांच्यासह अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, अप्पर पोलीस अधीक्षक (श्रीरामपूर) वैभव कलुबर्मे, पोलीस उपअधीक्षक अमोल भारती, पोलीस उपअधीक्षक (गृह) गणेश उगले आदी अधिकारी उपस्थित होते.

### एलसीबीतून आउटगोइंग केले पण इनकमिंग नाही

स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) मध्ये नियुक्ती मिळविण्याची अपेक्षा अनेक अंमलदारांनी व्यक्त केली होती. गेल्या पाच वर्षांपासून एलसीबीत नवीन नियुक्त्या झाल्या नसल्याने अनेक इच्छुक अंमलदारांच्या आशा अधीक्षक घार्गे यांच्या बदल्यांच्या प्रक्रियेवर लागल्या होत्या. मात्र, यंदाच्या दरबारात कोणत्याही अंमलदाराची एलसीबीत बदली झाली नसल्याचे समजते. उलट, सध्या एलसीबीमध्ये कार्यरत असलेले आणि बदल्यायोग्य ठरलेले अंमलदारांचीही शहराबाहेर बदली करण्यात आली आहे. सध्या एलसीबीचा कारभार संलग्न अंमलदारांवर सुरू आहे. यामुळे एलसीबीत नियुक्ती कधी मिळणार असा प्रश्न पोलीस अंमलदारांकडून उपस्थित केला जात आहे.

# घरात घुसून चौघांना मारहाण करत गाड्यांची केली तोडफोड

## बोल्हेगाव परिसरातील घटना, तिघा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – घराच्या बांधकामावरुन पूर्वी झालेल्या वादाचा राग मनात राहून तिघांनी घरात घुसून शिवीगाळ, दमदाटी करीत लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करीत ठार मारण्याची धमकी दिली. तसेच दुचाकी गाड्यांची तोडफोड करुन नुकसान केले. ही घटना बोल्हेगाव येथील भारत बेकरी जवळ, गांधीनगर येथे २८ मे रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत बाळासाहेब वामनराव वाघमारे (वय ५८, रा. भारत बेकरी जवळ गांधीनगर, बोल्हेगाव) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे व त्यांचे शेजारी राहण्यास असलेले आसाराम दगडखेर यांचे काही दिवसांपूर्वी घराच्या बांधकामावरुन वाद झालेले होते. त्या भांडणाचा मनात राग धरुन आसाराम दगडखेर याने २८ मे सकाळी १० च्या सुमारास फिर्यादी यांच्या घराबाहेर येऊन शिवीगाळ केली व तुम्हाला संध्याकाळी बघून घेतो अशी धमकी देऊन निघून गेला. त्यानंतर रात्री १० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी हे त्यांच्या घरात कुटुंबासह जेवण करीत असताना अचानक आसाराम दगडखेर, त्याचे नातेवाईक वैभव पालवे, राकेश भिंगारदिवे हे घरात घुसले आणि त्यांनी फिर्यादी व फिर्यादीच्या कुटुंबीयांना शिवीगाळ करुन लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. तसेच लाकडी दांडक्याने मारहाण केली. यावेळी फिर्यादी यांनी त्यांना प्रतिकार करुन कसेबसे घराच्या बाहेर ढकलले आणि दरवाजा आतून लावून घेतला. तिघांनी घराबाहेर बराच वेळ आरडाओरड करुन फिर्यादी यांच्या घराबाहेर असलेल्या मोटारसायकल आणि अँक्सेस मोपेड गाड्यांची तोडफोड करुन नुकसान केले.

याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात बाळासाहेब वाघमारे यांच्या फिर्यादीवरुन आसाराम दगडखेर, वैभव पालवे, राकेश भिंगारदिवे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास महिला पोलीस हवालदार शोभा सोनवणे या करीत आहे.

# स्टेशन रोडवरील बेकायदेशीर गॅस रिफीलिंग सेंटरवर छापा

## पोलिसांनी मुद्देमालासह एकाला घेतले ताब्यात, गुन्हा दाखल

नगर – बेकायदेशीररित्या घरगुती वापराचा गॅस, व्यावसायिक सिलेंडर मध्ये भरणाऱ्या गॅस रिफीलिंग सेंटरवर पुरवठा कार्यालयच्या पथकाने छापा टाकला. या कारवाईत २७ हजार ९२५ रुपयाचे गॅस रिफीलिंगचे साहित्य जप्त केले. ही कारवाई स्टेशनरोड वरील नेवासकर पेट्रोल पंपाचे शेजारी, खालकर हॉस्पीटल समोरील मोकळ्या मैदानात पत्र्याचे शेडमध्ये केली.

या बाबत पुरवठा निरीक्षक संतोष किसनराव घोलप (वय ५०) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की जिल्हा समन्वयक अधिकारी यांच्या आदेशाने पुरवठा विभागाच्या पथकाने कोतवाली पोलिसांच्या मदतीने ९ मे रोजी दुपारी नगर शहरातील स्टेशन रोड वरील नेवासकर पेट्रोल पंपाचे शेजारी, खालकर हॉस्पीटल समोरील मोकळ्या मैदानात पत्र्याचे शेडमध्ये जागेत सुरु असलेल्या गॅस रिफीलिंग सेंटरवर छापा टाकला. तेथे भारत गॅस कंपनीच्या घरगुती टाक्या स्वतः च्या कब्जात बाळगून, अनाधिकृतरित्या मशिनद्वारे घरगुती सिलेंडर मधुन रिक्षा मधील व्यावसायीक सिंलेडर मध्ये गॅस मध्ये भरत असलेल्या आकाश कैलास साळवे (रा.कोठी, स्टेशन रोड, अ.नगर) यास व रिक्षा चालकास ताब्यात घेतले.

पोलिसांनी तेथून १३ हजार १०० रुपये किमतीचे भारत गॅस कंपनीच्या पुर्ण भरलेले ४ घरगुती वापराचे सिलेंडर, ४ हजार ९५० रुपये किमतीचे भारत गॅस कंपनीचे अर्धवट भरलेले २ सिलेंडर गॅस, २ हजार ८७५ रुपये किमतीची भारत गॅस कंपनीचे अर्धवट भरलेले १ सिलेंडर गॅस, १४.२ किलो. ग्रॅम भरलेली वजनदार घरगुती वापराची गॅस टाकी, २ हजार रुपये किमतीचे न्यू ओरिजनल अग्रीकल्चर कंपनीचे २ इलेक्ट्रीक प्रेशर पंप, २ हजार रुपये किंमतीचा इलेक्ट्रीक वजन काटा, २ हजार रुपये किमतीचे यू प्लस व एक्साईड कंपनीच्या दोन इलेक्ट्रीकल बॅटरी, १ हजार रुपये किंमतीची नोझल ३ नग, २७ हजार ९२५ रुपये किंमतीचे साहित्य जप्त केले. जप्त मुद्देमाल अजय गॅस एजन्सी बुरुडगाव रोड येथे जमा केले आहे, तसेच उर्वरीत मुद्देमाल अन्नधान्य वितरण अधिकरी कार्यालय येथे जमा केला आहे. या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी संतोष घोलप यांनी २८ मे रोजी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून पोलिसांनी आकाश साळवे याचेविरुध्द भा.न्या.सं. २०२३ चे कलम २८७.२८८, १२५ सह अत्यावश्यक वस्तु कायदा १९९५ चे कलम ३ व ७ प्रमाणे गुन्हा दाखल केला.

## जिवे मारण्याची धमकी दिल्याच्या गुन्ह्यातील पाच आरोपी निर्दोष

नगर – घराच्या दरवाजाची कडी लावण्याच्या कारणावरुन आरोपी प्रदिप बाळासाहेब पठारे, राहुल बाळासाहेब पठारे, रामकिशोर मुन्नालाल कश्यप, सागर सहादू कोतकर, गोविंद किसनराव चन्ने यांनी मिळून संगनमताने फिर्यादीस पी. के. किराणा स्टोअरजवळ, सातपुते मळा, नगर–पुणे रोड, केडगांव, अहमदनगर येथे फिर्यादीचे घरी लाकडी दांडक्याने पाठीवर, डोक्यावर, हातावर, पायावर बेदम मारहाण करुन गंभीर दुखापती करुन जिवे मारण्याची धमकी दिली. याबाबत पाचही आरोपींविरुध्द कोतवाली पोलीस स्टेशनला भादंवि कलम १४३, १४७, १४८, १४९, ३२४, ३२३, ५०४, ५०६ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७ (१) (३), १३५ अन्वये गुन्हा रजि नंबर ६७६ / २०२२ च्या गुन्ह्याची नोंद होती. सदरच्या केसमध्ये सरकार पक्षातर्फे एकुण ६ साक्षीदार तपासण्यात आले. सदर प्रकरणी आरोपीच्यावतीने अ‍ॅड.विशाल बबनराव पठारे यांनी सर्व साक्षीदारांचा घेतलेला उलटतपास व केलेला युक्तीवाद ग्राह्य धरुन, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र. ५ वि. भि. शेट्टी, अहमदनगर यांनी २७ मे रोजी आरोपींची निर्दोष मुक्तता केलेली आहे. आरोपीचे वतीने अ‍ॅड. विशाल बबनराव पठारे यांनी काम पाहिले, व त्यांना मयुरी विशाल पठारे यांनी सहकार्य केले.

# नगर तालुक्यातील ९ गावठी दारूअड्ड्यांवर छापेमारी

**पोलिसांनी दोघांना मुद्देमालासह पकडले तर ७ जण झाले पसार**

नगर – नगर तालुक्यातील सांडवे, निमगाव वाघा, नेप्ती, खडकी शिवारात सुरु असलेल्या ९ गावठी हातभट्टीच्या अड्ड्यांवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापेमारी करत दोघांना १ लाख ७७ हजार ८६५ रुपये किमतीच्या मुद्देमालासह पकडले आहे. तर पोलिसांची चाहूल लागल्याने ७ जण पसार झाले आहेत. २८ मे रोजी ही कारवाई करण्यात आली.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या सूचना व मार्गदर्शनाखाली नगर तालुक्यातील सांडवा गावच्या शिवारात घराच्या भिंतीच्या आडोशाला सुरु असलेल्या हातभट्टी दारुअड्ड्यावर छापा टाकला असता दारु अड्ड्याचालक बद्रीनाथ माळी (पूर्ण नाव माहित नाही. रा. सांडवा) हा पसार झाला. पोलिसांनी तेथून ३ हजार ५०० रुपये किमतीची गावठी दारु जप्त केली. तसेच सांडवा फाटा येथील हॉटेल ऋतूजाचे आडोशाला सुरु असलेल्या दारु अड्ड्यावर छापा टाकून १ हजार ३६५ रुपये किमतीची दारु जप्त करुन विठ्ठल मारुती काळे (रा. सांडवा ता. नगर) यास ताब्यात घेतले. तिसऱ्या कारवाईत नेप्ती ते निमगाव वाघा जाणाऱ्या रोडवर पवार वस्ती येथील घराच्या भिंतीच्या आडोशाला सुरु असलेल्या दारु अड्ड्यावर छापा टाकून गणेश टिल्लू पवार (रा.नेप्ती, ता. नगर) यास ताब्यात घेऊन त्याच्याकडील ३५ हजार रुपये किमतीची गावठी दारु व साहित्य जप्त केले.

चौथ्या कारवाईत पवार वस्ती येथे सुरु असलेल्या दारु अड्ड्यावर छापा टाकला असता तेथील दारु विक्री करणारी महिला पोलिसांना पाहताच पसार झाली. पोलिसांनी तेथून १३ हजार ५०० रुपये किमतीची गावठी दारु व साहित्य जप्त केले. पाचव्या कारवाईत निमगाव वाघा येथील नवनाथ मंदिराच्या पाठीमागे घराच्या भिंतीच्या आडोशाला असलेल्या दारु अड्ड्यावर छापा टाकून २० हजार रुपये किमतीची गावठी हातभट्टीची दारु जप्त केली. या कारवाई दरम्यान दारु विक्री करणारी महिला तेथून पसार झाली. सहाव्या कारवाईत नेप्ती येथील रान मळ्याच्या कडेला असलेल्या ओढ्याजवळील दारु अड्ड्यावर छापा टाकून ८ हजार रुपये किमतीची गावठी दारु जप्त केली. कारवाई दरम्यान दारुअड्डा चालक गोरख बाबा जपकर (रा. रानमळा,नेप्ती, ता. नगर.) हा पळून गेला. सातव्या कारवाईत खडकी गावात घराच्या आडोशाला सुरु असलेल्या दारु अड्ड्यावर छापा टाकला असता दारुअड्डा रवींद्र विश्वनाथ पवार हा पोलिसांना पाहताच तेथून पसार झाला. पोलिसांनी तेथून ३४ हजार ५०० रुपये किमतीची गावठी दारु जप्त केली.

आठव्या कारवाईत खडकी गावामध्ये घराच्या आडोशाला सुरु असलेल्या दारु अड्ड्यावर छापा टाकला असता तेथे दारु विक्री करणारी महिला पोलिसांना पाहताच तेथून पसार झाली. पोलिसांनी तेथून २५ हजार ५०० रुपये किमतीची गावठी हातभट्टीची दारु जप्त केली. तसेच पोलिसांनी खडकी गावात सुरु असलेल्या एका दारु अड्ड्यावर छापा टाकला असता अड्डाचालक एकनाथ विश्वनाथ पवार हा पोलिसांना पाहताच पसार झाला. पोलिसांनी तेथून ३० हजार ५०० रुपये किमतीची गावठी हातभट्टीची दारु व दारु बनवण्याचे साहित्य असा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५ (ई), (फ) प्रमाणे ९ वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# शिक्षिका संजना चेमटे यांची विद्यार्थ्यांसाठी व शिक्षकांसाठी ई - साहित्य निर्मिती

नगर – नगर तालुक्यातील यशवंतनगर येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील शिक्षिका संजना चेमटे यांनी विद्यार्थ्यांसाठी आणि शिक्षकांसाठी विविध विषयातील विविध घटकांवरही साहित्य निर्मिती केली आहे. यासाठी त्यांनी स्वतः चे यूट्यूब चॅनल आणि ब्लॉग निर्मिती करून त्यावर विविध प्रकारचे उपयुक्त असे ई – साहित्य अपलोड केले आहे. त्यांच्या चॅनेलवर विविध विषयांवर विविध प्रकारच्या शैक्षणिक बाबींचे, उपक्रमांचे व्हिडिओ अपलोड करण्यात आले आहेत. निपुण महाराष्ट्र अभियान अंतर्गत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र यांच्या वतीने संपूर्ण राज्यात विद्यार्थ्यांसाठी कृती कार्यक्रम राबवित आहे. यामध्ये जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था संगमनेर यांच्यावतीने या कृती कार्यक्रमात संजना चेमटे यांनी जिल्ह्यातील व राज्यातील विद्यार्थ्यांसाठी भाषा कृतींचा बुधवार यामध्ये इयत्ता दुसरी ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी पायाभूत साक्षरतामध्ये वाचन व लेखन याविषयी ऑनलाईन कृतिशील उपयुक्त मार्गदर्शन केले. त्याबाबत त्यांच्या मार्गदर्शनाचा व्हिडिओ शासनाच्या ॲपवर अपलोड करण्यात आलेला आहे. शासनाच्या वतीने उन्हाळ्याच्या सुट्टीत भाषा व गणित विषयांच्या कृतिकार्यक्रमातील विविध कृतींच्या अभ्यासासाठी पालकांना व विद्यार्थ्यांना मार्गदर्शक अशी कृतीपुस्तिका निर्मिती करण्यात आली. यामध्ये शिक्षिका संजना चेमटे योगदान देऊन त्यांच्या विविध शैक्षणिक पंधरा ई – साहित्याचा म्हणजे व्हिडिओंचा समावेश करण्यात आलेला आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र आणि ई–बालभारती पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने कोरोना काळात राज्यातील विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी मार्गदर्शन करण्यासाठी ऑनलाईन क्लास घेण्यात आले होते. त्यामध्ये संजना चेमटे यांनी १५ ऑनलाईन क्लास घेतले. त्याबाबतचे व्हिडिओ म्हणजे ई – साहित्य शासनाच्या विविध पोर्टल व ॲपवर अपलोड करण्यात आलेले आहेत. त्यांच्या उपक्रमाचे शैक्षणिक व्हिडिओ शासनाच्या एम.पी.एस.पी च्या विविध ॲपवर अपलोड करण्यात आले आहेत. त्यांचा उपयोग इतर शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना वेळोवेळी होत आहे. कोरोना काळात सर्व जग थांबले पण शिक्षण चालू ठेवण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांनी शिकू आनंदे हा ऑनलाईन उपक्रम सुरू केला. यामध्ये शिक्षिका संजना चेमटे यांनी राज्यातील विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना साहित्य कवायतबाबत ऑनलाईन कृतीशील मार्गदर्शन केले. याबाबतचे त्यांचे व्हिडिओ शासनाच्या ॲपवर, पोर्टलवर अपलोड करण्यात आले आहेत. आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी त्या नेहमी यू.ट्यूब, व्ही. स्कूल ॲप, दीक्षा ॲप यांमधील ई– साहित्याचा वेळोवेळी अध्ययन अध्यापनात वापर करतात. संगणक व इंटरॲक्टिव्ह बोर्डद्वारे विविध ई – साहित्यांचा अध्ययन अध्यापनात वापर करतात.



शिक्षिका संजना चेमटे यांनी विद्यार्थ्यांसाठी व शिक्षकांसाठी ई – साहित्य निर्मिती केली आहे.

# पावसात खड्ड्यांपासून वाचवली शेकडो वाहने



नगर – शहरात २७ मे रोजी दुपारी जोरदार पाऊस झाला. शनी चौकातून माळीवाडयाकडे जाणाऱ्या रस्त्यावर ड्रेनेजच्या चेंबरची झाकणे पाण्याच्या दबावामुळे बाजूला पडली. चेंबर उघडे पडून मोठे खड्डे तयार झाले. पाण्याचा अंदाज न आल्याने काही जण वाहनासकट खड्ड्यांमध्ये पडू लागले. हे निदर्शनास येताच शिक्षक डॉ. अमोल बागुल हे नागरिकांच्या मदतीला धावले. त्यांनी वाहन चालकांना खड्ड्याची कल्पना देत वाचवले.

खड्डे व रस्ता नियंत्रणाचे सुमारे तीन तास भर पावसात त्यांनी काम केले. पाऊस थांबल्याशिवाय गत्यंतर नव्हते. मग शेकडो माणसे व वाहने खड्ड्यांमध्ये पडण्यापासून वाचवण्याचे काम त्यांनी हाती घेतले. प्रसंगी पाण्यामुळे त्यांच्या बंद पडलेल्या गाड्या देखील त्यांनी ढकलल्या. दोन्ही बाजूंच्या काही वाहने व माणसांना खड्ड्यांकडे येवू न देता मागे पाठवले.

जवळच भंगारात पडलेले मोकळे बाकडे खड्ड्यांवर टाकण्याचा प्रयत्न केला. परंतु पाण्याच्या अतिप्रवाहामुळे तेही वाहून जाऊ लागले. रस्ता अडवल्यामुळे काही वाहन चालकांची बोलणी देखील खावी लागली तरी बागुल यांनी हे काम नेटाने चालू ठेवले. पाऊस संपून पाणी ओसरल्यानंतर त्यांनी घरचा रस्ता धरला, अशी माहिती त्यांनी दिली.

# रेल्वे स्टेशन परिसरातून वृद्ध महिला बेपत्ता



सुगराबी शेख

नगर – नगर शहरातील रेल्वे स्टेशन भागातील भीमवाडी येथील राहत्या घरातून सुगराबी कासीम शेख (वय ६४) ही महिला घरात कोणास काही एक न सांगता २७ मे रोजी दुपारी ३ ते ४ च्या दरम्यान कोठेतरी निघून गेली आहे. तिच्या कुटुंबीयांनी तिचा रेल्वे स्टेशन परिसर, नगर शहरात, नातेवाईकांकडे सर्वत्र शोध घेतला मात्र ती कोठेही आढळून आली नाही. सदर बेपत्ता महिला ही मानसिक दृष्ट्या आजारी आहे.

याबाबत शब्बीर कासिम शेख (रा. पंचायत समिती कार्यालयासमोर, भीमवाडी, रेल्वे स्टेशन रोड) यांनी दिलेल्या माहितीवरुन कोतवाली पोलिसांनी हरवल्याची नोंद केली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार संगीता बडे या करीत आहेत. सदर महिला कोठे आढळून आल्यास कोतवाली पोलीस ठाणे फोन (०२४१) २४१६११७, पोलीस हवालदार संगीता बडे मो. ८९ ९९ १७ १७ ५७, शब्बीर शेख मो. ७२७६४९३८६२ यावर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## घरासमोर लावलेल्या मोपेडची चोरी

नगर – घराच्या समोर, रस्त्याच्या कडेला हॅण्डल लॉक करुन लावलेली सुझुकी कंपनीची एक्सेस मोपेड (क्र. एम एच १६ डी के १९५९) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली. ही घटना सिद्धार्थनगर येथील गणपती मंदिराजवळ २७ मे रोजी रात्री ते २८ मे रोजी सकाळी साडेपाच वाजण्याच्या दरम्यान घडली. याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी सचिन पोपट सीतापुरे (वय ४२ रा. घर नंबर २३, पहिली चाळ, गणपती मंदिरा शेजारी, सिद्धार्थनगर, अ.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध बी एन एस कलम ३०५ (ब ) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार महादेव गरड हे करीत आहेत.

# श्री लक्ष्मी महिला नागरी पतसंस्थेला दिलेला चेक न वटल्याने आरोपीस ४२,००० रुपये दंड व चार महिने सश्रम कारावास

नगर – श्री लक्ष्मी महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या. अहमदनगर या पतसंस्थेकडून संभाजी लक्ष्मण गुंजाळ यांनी व्यवसाय वाढीसाठी रु.५०,०००/– चे कर्ज घेतले होते व सदरचे कर्ज १५ महिन्यामध्ये परत फेडण्याची हमी दिली होती परंतु त्यांनी नियमित कर्ज न फेडल्यामुळे सदर कर्जास असलेले जामिनदार नितीन सुनिल बागडे यांनी फिर्यादी पतसंस्थेत १५/०९/२०२० रोजी रक्कम रुपये २९,००० चा पुर्णवादी नागरी सहकारी बँक लि. शाखा अहमदनगर या बँकेचा चेक दिला व सदरचा चेक निश्चित वटेल असा विश्वास व भरवसा दिला. परंतु आरोपीचे खात्यामध्ये पुरेशी रक्कम शिल्लक नसल्याने सदरचा चेक न वटता परत आला. त्यामुळे आरोपीविरुध्द पतसंस्थेने निगोशिएबल इंन्स्ट्रूमेंट ॲक्ट कलम १३८ अन्वये दाखल केलेल्या केसची सुनावणी अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, अहमदनगर यांचे समोर होऊन कोर्टाने आरोपी नितीन सुनिल बागडे यास रु.४२,००० द्रव्यदंडाची शिक्षा तसेच चार महिना सश्रम कारावासाची शिक्षा सुनावणी व सदरचा द्रव्यदंड न भरल्यास पुढील एक महिना सश्रम कारावसाची शिक्षा सुनावली. या कामी फिर्यादी पतसंस्था यांचे वतीने माहितगाव इसम म्हणुन सुहास त्रिंबक मोहोरकर, ॲड. राजु भास्कर गाली, अहमदनगर यांनी काम पाहिले.

## मंगलदिप मल्टीस्टेटच्या कर्जदारास ४ महिने कैद व ७५,००० रुपये दंडाची शिक्षा

नगर – अहमदनगर येथील अति. मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने अहिल्यानगर यास कर्जदार निलोफर अलिम शेख, रा. मुकुंद नगर, निगोशिएबल इंस्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ अन्वये दोषी ठरवून ४ महिने कैद व ७५,००० रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे. दंडाची रक्कम न भरल्यास १ महिना कैद भोगण्याची शिक्षा देखील दिलेली आहे. तसेच नुकसान भरपाई रक्कम फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांना मंगलदिप यांनी शेख देण्याचा आदेश दिलेला आहे. निलोफर अलिम मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी, यांचेकडुन घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीपोटी दिलेला धनादेश वटला नाही व नोटीस मिळुनही धनादेशाची रक्कम दिली नाही त्यामुळे संस्थेने निलोफर अलिम शेख यांचे विरूद्ध न्यायालयात फिर्याद दाखल केलेली होती. संस्थेतर्फे देण्यात आलेला पुरावा ग्राह्य धरूण न्यायालयाने कर्जदार निलोफर अलिम शेख यांना वरील प्रमाणे शिक्षा सुनावली आहे. संस्थेच्या वतीने सागर लक्ष्मण फुलारी, भाउसाहेब वाघुले व रामचंद्र पानसरे यांची साक्षी महत्वाची ठरली. फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांचे करीता ॲड. सुहास. एस. टोणे यांनी न्यायालयात बाजु मांडली. त्यांना ॲड. अमित अडागळे व ॲड.विलास ढोणे, ॲड.गौरव हरबा, ॲड.ओम गुंड यांनी सहकार्य केले.

# अहिल्यानगरमध्ये १ जून रोजी पद्मशाली समाजाच्या राज्यस्तरीय वधु–वर मेळाव्याचे आयोजन

नगर – अहिल्यानगर येथील पद्मशाली समाजातर्फे १ जून रोजी सकाळी ९ ते संध्याकाळी ५ या वेळेत दातरंगे मळा येथील श्री मार्कंडेय संकुलामध्ये राज्यस्तरीय पद्मशाली समाज वधु–वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी नववधू–वरांच्या बरोबरच पुनर्विवाह वधू–वरांचा सुद्धा मेळाव्याचा कार्यक्रम होणार असून यासाठी शेवटचा १ तास राखून ठेवल्याची माहिती सौ. स्वाती सिरसुल यांनी दिली.

वधू–वरांचे पालक व्हाट्सअप नंबर वर सुद्धा वधू–वरांचा बायोडाटा पाठवण्याची सोय आयोजकांनी केलेली असून त्याची नोंदणी फी प्रत्येकी ३०० रुपये राहील.

# मंगलदिप मल्टीस्टेट सोसायटीच्या कर्जदारास एक महिने कैद व ७२,००० रुपये दंडाची शिक्षा

नगर – अहमदनगर येथील अति.मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने कर्जदार शाहिस्ता इस्माईल शेख, रा. मुकुंद नगर, अहिल्यानगर निगोशिएबल इंस्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ अन्वये दोषी ठरवून १ महिना कैद व ७२,००० रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे. दंडाची रक्कम न भरल्यास १५ दिवस कैद भोगण्याची शिक्षा देखील दिलेली आहे. तसेच नुकसान भरपाई रक्कम फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटीस शाहिस्ता इस्माईल शेख यांनी देण्याचा आदेश दिलेला आहे. यांनी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी, यांचेकडुन घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीपोटी दिलेला धनादेश वटला नाही व नोटीस मिळुनही धनादेशाची रक्कम दिली नाही त्यामुळे संस्थेने शाहिस्ता इस्माईल शेख यांचे विरूद्ध न्यायालयात फिर्याद दाखल केलेली होती. संस्थेतर्फे देण्यात आलेला पुरावा ग्राह्य धरूण न्यायालयाने कर्जदार शाहिस्ता इस्माईल शेख यांना वरील प्रमाणे शिक्षा सुनावली आहे. संस्थेच्या वतीने सागर लक्ष्मण फुलारी, भाउसाहेब वाघुले व रामचंद्र पानसरे यांची साक्षी महत्वाची ठरली. फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांचे करीता ॲड. सुहास. एस. टोणे यांनी न्यायालयात बाजु मांडली. त्यांना ॲड. अमित अडागळे व ॲड. विलास ढोणे, ॲड. गौरव हरबा, अड. ओम गुंड यांनी सहकार्य केले.

